

आजचा रंग निळा

दुर्गे स्मृता हरसि भीतिमशेष जन्तोः
स्वस्थैः स्मृता मतिमतीव शुभां ददासि।
दारिद्र्य दुःख भयहारिणि का त्वदन्या
सर्वोपकार करणाय सदार्द्रचित्ता।।

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ९ ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹

### वरसई सरपंच अपात्र

**पेण :** तालुक्यातील वरसई ग्रामपंचायतीच्या सरपंच रेखा सचिन पाटील यांनी २६ जानेवारी २०२४ ची ग्रामसभा न घेतल्याचा फटका बसला आहे. याप्रकरणी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी त्यांना अपात्र ठरवले आहे. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामपंचायत वरसई येथील ग्रामसेवक यांच्याविरुद्ध महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामधील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करावी, असेही आदेशात म्हटले आहे. त्यानुसार ग्रामसेवक यांच्यावरसुद्धा निलंबनाची टांगती तलवार कायम आहे. पान २ वर




# आमदारांनी मतदारांना वाऱ्यावर सोडलं

। अलिबाग । प्रतिनिधी ।

ज्यांना निवडून दिलं, त्यांनी या भागातील मतदार, गाव-वाड्यांमधील जनतेला वाऱ्यावर सोडलं. शिंदे गटातील मंडळींनी या भागातील अनेक गावं, घरं विकली. मिठेखार, चेहेर गावातील अनेकांच्या जमिनी गेल्या. नोकऱ्यांअभावी तरुणही बेरोजगार राहिला. त्यामुळे महिलांसह तरुणाईमध्ये संताप आहे. चित्रलेखा पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित महिलांचा आजचा मेळावा उद्याच्या परिवर्तनाची नांदी असणार आहे. चित्रलेखा पाटील यांच्या रुपाने आमदार म्हणून या भागातील जनतेला न्याय मिळेल, असा विश्वास माजी जि.प. सदस्या तथा ठाकरे गटाच्या नेत्या राजश्री मिसाळ यांनी व्यक्त केला.

## राजश्री मिसाळ यांचा घणाघात

रायगड जिल्हा महिला बचतगट फेडरेशन पुरस्कृत, लेक शिवबाची अंतर्गत भव्य महिला संवाद मेळावा साळाव येथे मंगळवारी (दि.८) आयोजित करण्यात आला होता. यावेळी राजश्री मिसाळ बोलत होत्या.

यावेळी शेकाप रायगड जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, रायगड जिल्हा महिला बचतगट फेडरेशनच्या उपाध्यक्षा तथा नगरपालिकेच्या माजी नगरसेविका वृषाली ठोसर, शेकाप महाराष्ट्र राज्य विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा साम्या कोरडे, मुरूड पंचायत समितीच्या सदस्या निता गिदी, रेवदंड्याच्या माजी सरपंच सोनाली मोरे, आक्षीच्या सरपंच रश्मी पाटील, प्रियांका चुनेकर, भारती बंदरी, सोनाली कासार, प्रीती नलावडे आदी मान्यवरांसह शेकाप महिला आघाडीच्या पदाधिकारी, सदस्या, इंडिया आघाडीच्या पदाधिकारी, सदस्या, विभागातील हजारो महिला व कार्यकर्ते उपस्थित होते. पान २ वर

### राज्य सरकारनं बहिणींना लुटलं

पेन्शन बंद करून लाडकी बहीण योजनेंतर्गत महिलांना पंधराशे रुपये दिले. त्यामुळे पेन्शनधारकांचा तळतळाट या सरकारने घेतला आहे. दीड हजार रुपये देऊन आपल्याकडून महागाईच्या रुपात दुपटीने वसूल करण्याचा घाट सरकारने घातला आहे. दैनंदिन वापरातील वस्तूंच्या किमती वाढविण्यात आल्या आहेत. ज्याप्रमाणे गोड बोलून बहिणींकडून सही घेऊन तिच्या मालकीची मालमत्ता लुटण्याचा प्रयत्न काही भाऊ करतात. त्याप्रमाणे हा प्रकार असल्याचा आरोप मिसाळ यांनी केला.

# 'नंदनवन' 'इंडिया'चे !

## जम्मू-काश्मीरमध्ये आघाडीची बाजी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

काश्मीर म्हणजे साक्षात पृथ्वीवरील नंदनवन. विधानसभा निवडणुकीत या नंदनवनावर इंडिया आघाडीने एक हाती विजय मिळवत बाजी मारली असून, भाजपाचे सत्ता काबीज करण्याचे स्वप्न धुळीस मिळवले आहे. कलम ३७० हटवल्यानंतर दहा वर्षांनंतर पहिल्यांदाच येथे निवडणुका घेण्यात आल्या. केंद्रातील सत्तेच्या जोरावर काश्मिरात सत्ता स्थापन करण्याचे भाजपाचे मनसुबे येथील जनतेने उद्ध्वस्त केले. केंद्र सरकारने घेतला निर्णय येथील जनतेला मान्य नाही, हे निकालातून दिसून आले आहे. या निवडणुकीत काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सच्या आघाडीने ५२ जागा जिंकल्या आहेत. दरम्यान, सर्वाधिक



जागा जिंकणाऱ्या नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला यांनी ओमर अब्दुल्लांची मुख्यमंत्री म्हणून घोषणा केली आहे.

जम्मू-कश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देणारे ३७० कलम २०१९ मध्ये हटवण्यात आले. त्यानंतर जम्मू-कश्मीर आणि लडाख असे दोन केंद्रशासित प्रदेश पान २ वर




### भाजपाला जोरदार दणका

### 'आप'च्या झाडूने भाजपाची सफाई

आपने एक जागा जिंकत विधानसभेत खाते उघडले आहे. दरम्यान, डोडा विधानसभा मतदारसंघातून आम आदमी पक्षाचे उमेदवार मेहराज मलिक चार हजारांहून अधिक मतांनी विजयी झाले आहेत. त्यांनी भाजपचे उमेदवार गजयसिंह राणा यांचा पराभव केला आहे. डोडा मतदारसंघात काँग्रेसने शेख रियाझ अहमद यांना, तर नॅशनल कॉन्फरन्सने खलिब नजीब सुहरवर्दी यांना उमेदवारी दिली होती. परंतु, येथे भाजप आणि आम आदमी पार्टीमध्ये काटाजोड आणि चुरशीची लढत झाली. आणि यात आप उमेदवाराने बाजी मारली. मेहराज मलिक हे प्रदीर्घ काळापासून आम आदमी पक्षाशी संबंधित असून, लोकप्रिय नेते आहेत.

### विनेशने मैदान मारलं..!

हरियाणा विधानसभा निवडणुकीत काँग्रेस उमेदवार कुस्तीपटू विनेश ऑलिम्पिक खेळाडू विनेश फोगाट हिने मैदान मारले असून, जुलाना मतदारसंघातून सहा हजारांहून अधिक मतांनी भाजपच्या योगेश बैरागी यांचा पराभव केला. विनेश यांना ६५,०८० मते, तर योगेश कुमार यांना ५९,०६५ मते मिळाली. कुस्तीपटूंचे आंदोलन आणि ऑलिम्पिक अपात्रतेमुळे चर्चेत आलेल्या विनेश फोगट यांना काँग्रेसने निवडणूक मैदानात उतरवले होते. विनेशच्या विजयामुळे काँग्रेसने १९ वर्षांनंतर येथे मुसंडी मारली आहे. काँग्रेसचा उमेदवार शेवटचा २००५ ला येथून विजयी झाला होता. त्यानंतर आता पुन्हा या मतदारसंघात काँग्रेसने बाजी मारली आहे.

### हरियाणामध्ये पुन्हा कमळ फुलले

हरिणाया विधानसभेमध्ये पुन्हा एकदा भाजपने बाजी मारली असून, जवळपास ५० जागा जिंकल्या आहेत. भाजपने बहुमताचा ४६ हा आकडा गाठला. तर, काँग्रेसला ३६ जागांवर समाधान मानावे लागले. हरियाणातल्या विधानसभा निवडणुकीत विजयाची हॅट्ट्रिक करत भाजप तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करणार आहे. निकालात सकाळच्या सत्रात काँग्रेस आघाडीवर होती, पण नंतर भाजपनं मोठी झेप घेतली. लोकसभा निवडणुकीत फटका बसल्यानं हरियाणाच्या भाजपचा हा पहिला मोठा विजय आहे. हरियाणाच्या नवीन मुख्यमंत्र्यांचा शपथविधी विजयादशमीच्या दिवशी १२ ऑक्टोबरला होण्याची शक्यता आहे. हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या सात महिने आधी भाजपने अचानक तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांना पदावरून हटवून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. खरे तर, भाजपने २०१९ मध्येही खट्टर यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवली होती. तेव्हा भाजपला बहुमत मिळाले नव्हते. मात्र, जेजेपीच्या पाठिंब्याने भाजपला सरकार स्थापन करण्यात यश आले.

# गरज सरो आणि वैद्य मरो

- खासदार तटकरेंनी खरे रंग दाखवल्याने भाजपा नाराज
- 'लाडकी बहीण' कार्यक्रमाकडे लाडक्या भावा-बहिणींची पाठ
- 'बायकॉट श्रीवर्धन' मोहीम राबवणार

। रायगड । खास प्रतिनिधी ।

रायगड लोकसभा मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांना निवडून आणण्यासाठी भाजपाने जीवाचे रान केले होते. महायुतीमधील घटक पक्षातील सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा शब्द निवडणुकीपूर्वी खासदार तटकरे यांनी दिलेला शब्द आता ते विसरले आहेत. भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांचे राजकीय खच्चीकरण करण्याचा उद्योग त्यांच्याकडून सुरु आहे. त्याला विरोध म्हणून 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' वचनपूर्ती सत्कार सोहळा कार्यक्रमात भाजपाच्या महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जाऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत,



अशी माहिती भाजपाचे रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी 'कृषीवल'शी बोलताना दिली.

भाजपाच्या पदाधिकाऱ्यांच्या या भूमिकेमुळे महायुतीमधील खदखद समोर आली असून, यापुढे त्यामध्ये अधिक वाढ होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. निवडून येण्यासाठी पान २ वर

## पुन्हा संरक्षक जाळीवर उड्या

। मुंबई । वृत्तसंस्था ।

नगर समाजाला आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देऊ नये, यासाठी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ आणि आ. हिरामण खोसकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी मंत्रालयातील संरक्षक जाळीवरच उड्या मारल्याची घटना ताजी असतानाच मंगळवारी (दि. ८) धनगर समाजातील तीन व्यक्तींनी मंत्रालयातील संरक्षक जाळीवर उड्या मारल्या. या घटनेने खळबळ उडाली असून, पोलिसांनी त्या तिघांना तेथून बाहेर काढून ताब्यात घेतले आहे.

## सणासुदीत अलिबाग पाण्याविना

- नगरपरिषद प्रशासनाचा दुर्लक्षपणा
- हजारो नागरिकांना बसणार फटका

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जिल्ह्यामध्ये सध्या नवरात्र उत्सवाची धामधूम सुरू आहे. ऐन सणासुदीत अलिबाग शहरात काही भागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. नगरपरिषद प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे शहरातील हजारो नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.

गेल्या अडीच वर्षांपासून नगर परिषदेवर प्रशासन राज आहे. मुख्याधिकारी अंगाई साळुंखे या रजेवर गेल्या आहेत. त्यामुळे पेणचे मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्याकडे अलिबागचा अतिरिक्त कार्यभार सोपावण्यात आला आहे. प्रशासनाच्या भरोवशावर कारभार सुरळीत चालेल अशी अपेक्षा होती. परंतु, शहरातील नागरिकांचा भ्रमनिरास झाला आहे. नवरात्रौत्सवात अलिबाग शहरातील काही भागात पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. पाणीपुरवठा करणाऱ्या लाईनमध्ये गेल्या सात दिवसांपासून बिघाड असल्याची माहिती समोर येत आहे.

# आज सेझग्रस्तांबाबत अंतिम सुनावणी

### ५२३ हून अधिक शेतकऱ्यांचा समावेश

। चिरनेर । प्रतिनिधी ।

सेझग्रस्त शेतकरी व सेझ कंपनी यांच्यामध्ये जिल्हाधिकारी रायगड येथे उद्या बुधवारी (दि. ९) सकाळी ११ वाजता अंतिम सुनावणी ठेवण्यात आली आहे. यात उरण, पनवेल, पेण तालुक्यातील ५२३ हून अधिक सेझग्रस्त शेतकऱ्यांबाबत शासन काय निर्णय घेतेय या भूमिकेकडे लक्ष लागून राहिले आहे.

दरम्यान, सेझग्रस्त शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या समस्यांकडे राज्य शासन नेहमी दुर्लक्ष करीत असल्याचे बोलले जात आहे. या सेझग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळावा या अनुषंगाने तसेच रायगड जिल्ह्यातील उरण, पेण, पनवेल तालुक्यातील मे. मुंबई इंटीग्रेटेड एसईझेड लि. या कंपनीला मुंबई कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ६३ अ अनुसार विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करण्याकरिता पान २ वर

### निधीविना लाखो रुपयांचे वेतन रखडले

# कंत्राटी डॉक्टर, परिचारिकांना वेतनाची प्रतीक्षा

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयातील कंत्राटी डॉक्टरांसह परिचारिका विनावेतन सेवा देत आहेत. गेल्या दोन महिन्यांपासून त्यांचे वेतन झाले नसल्याची माहिती उघड झाली आहे. वेतन मिळाले नसल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट उभे राहिले असून, ऐन सणासुदीत उसनवारीवर काम चालत आहे. महिन्याच्या खर्चाचा ताळमेळदेखील बिघडला आहे. शासनाकडून निधी न आल्याने हे वेतन रखडल्याचे जिल्हा रुग्णालयाकडून सांगण्यात आले आहे. ५० लाख रुपयांच्या निधीची गरज असल्याचे बोलले जात आहे.

अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयातील इमारत ४० वर्षांहून अधिक वर्षांची असून, या इमारतीमध्ये अडीचशे खाटांचे रुग्णालय आहे. या रुग्णालयात हजारोंच्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येतात. शहरी भागासह ग्रामीण भागातील खेड्यातील रुग्ण रुग्णालयात येतात. रुग्णालयात रुग्णांची संख्यादेखील प्रचंड वाढू लागली आहे. वाढत्या रुग्णांच्या संख्येने नियमित डॉक्टर, परिचारिका व इतर कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून रुग्णालयात कंत्राटी डॉक्टर व परिचारिकांची नेमणूक केली जाते. अकरा महिन्यांच्या करारावर ही नियुक्ती करण्यात आली आहे. अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात २५ परिचारिका व १५ डॉक्टर रुग्णांना सेवा देण्याचे काम करीत आहेत. मात्र, त्यांचे वेतन वेळेवर मिळत नसल्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. जिल्हा रुग्णालयातील परिचारिका व डॉक्टरांचे जुलै व सप्टेंबर महिन्याचे मानधन मिळाले नसल्याची माहिती रुग्णालयातून उपलब्ध झाली आहे. शासनाकडून निधी न आल्याचा फटका यांना बसत आहे. दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मिळणाऱ्या वेतनासाठी आता दोन ते तीन महिने प्रतीक्षा करावी लागत आहे. वेतन मिळत पान २ वर

> "शासनाकडून निधी नियमित वितरीत करण्याबाबत प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे कंत्राटी डॉक्टर व परिचारिकांचे वेतन थांबले आहे. ही प्रक्रिया नियमित झाल्यावर वेतनाचा प्रश्न कायमचा मार्गी लागेल.
> – अंबादास देवमाने, जिल्हा शल्यचिकित्सक"

## तिढा सुटला!

। मुंबई । वृत्तसंस्था ।

महाविकास आघाडीच्या जागावाटपाबाबत मंगळवारी (दि. ८) रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असून, सर्व जागांचा तिढा जवळपास सुटला आहे. त्यामुळे आता ११ तारखेला महाविकास आघाडीची पत्रकार परिषद पार पडणार आहे. यावेळी शरद पवार, उद्धव ठाकरे आणि नाना पटोले पत्रकारांना संबोधित करुन जागावाटप जाहीर करतील, अशी माहिती यावेळी देण्यात आली. या बैठकीला मविआचे वरिष्ठ नेते उपस्थित होते.



## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

९ ऑक्टोबर

१) श्रीम. पुष्पा प्रफुल्ल राऊत ९-१०-१९४७
२) श्री. शांताराम वामन कोरगावकर चेंढरे-अलिबाग, ९-१०-१९४४
३)श्री. शशिकांत गजानन पाटील विद्यानगर, अलिबाग ९-१०-१९५१
४)श्री. मिलिंद बालकृष्ण कोलगे रामनाथ रोड, अलिबाग ९-१०-१९५७
५) श्री. प्रदीप वसंत गोडबोले ब्राम्हणआळी, अलिबाग ९-१०-१९५८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**
**श्री. प्रदीप वसंत गोडबोले, वाढदिवस अलिबाग**

# 'भूमीअभिलेख'चा सावळागोंधळ



## कर्मचाऱ्यांची मनमानी; नागरिकांना त्रास

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड तालुका भूमीअभिलेख कार्यालयात अपुरा कर्मचारी वर्ग, प्रभारी अधिकारी यामुळे या विभागात सध्या सावळागोंधळ सुरू आहे. त्यातच सध्या अस्तित्वात असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मनमानीपणामुळे या कार्यालयात येणाऱ्या नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.

महाड तालुक्याचा विस्तार मोठा आहे. भौगोलिकदृष्ट्या क्षेत्रदेखील मोठे आहे. यामुळे येथील तालुका भूमीअभिलेख कार्यालयामध्ये सतत नागरिकांची वर्दळ असते. जमीन क्षेत्राशी संलग्नित असलेल्या कामांसाठी नागरिकांची गर्दी असते. त्यातच महाड तालुक्यामध्ये जमीन खरेदी-विक्री व्यवहार मोठ्या प्रमाणावर असल्याने जमिनीशी संबंधित दाखले मिळवण्याकरिता तालुका भूमीअभिलेख कार्यालयामध्ये महाडसह मुंबई, पुणे, सूरत आदी शहरांमधील नागरिकांचा ओढा कायम असतो.

गेले काही दिवसांपासून या ठिकाणी माणगाव येथील अधिकारी सोनार यांच्याकडे महाड कार्यालयाचा पदभार सोपवलेला आहे. हा पदभार प्रभारी असल्याकारणाने ते ठराविक दिवशी महाडमध्ये येत असतात. त्यातच अनेक कर्मचारी बदली झालेले असल्याने त्या जागी नवीन कर्मचारी दाखल झालेले नाही, यामुळे अपूर्ण कर्मचाऱ्यांचा त्रास नागरिकांना होत आहे. एका-एका कामासाठी नागरिकांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. महाड तालुका भूमीअभिलेख कार्यालयामध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांकडून नागरिकांना मनमानी आणि उध्दटपणाचे वर्तन अनुभवास मिळत आहे, यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

बिरवाडी येथील गणेश दाजी सावंत यांनी आपले एका जागेची रीतसर मोजणी करून मिळावी याकरिता अर्ज केला होता. अर्जानुसार तालुका भूमीअभिलेख कार्यालयाने गणेश सावंत यांच्याकडून जमीन मोजणीची रक्कम भरून घेतली. जमीन मोजणी करण्यासाठी तारीखदेखील देण्यात आली. मात्र, काही दिवसांनी तुमची जमीन मोजता येणार नाही, याकरिता हरकत घेण्यात आली असल्याचे सांगितले. त्यानुसार सावंत यांनी कार्यालयांमध्ये धाव घेतली असता ज्यांचे नाव कार्यालयातील कर्मचारी यांनी सांगितले असता त्या हरकत घेणाऱ्या व्यक्तीचा सदरहू जमिनीशी कोणताच संबंध नसल्याचे किंवा चतुः सीमामध्येदेखील ते कुठेच नसल्याचे सावंत यांनी सांगितले. शिवाय, त्यांनी दिलेल्या अर्जावरदेखील अर्जदाराची सही नसल्याचे दिसून आले. याचा अर्थ, महाड तालुका भूमीअभिलेख कार्यालयामध्ये मनमानी सुरू असल्याची गंभीर तक्रार शेतकरी कामगार पक्षाचे महाड तालुका चिटणीस गणेश सावंत यांनी केली आहे. तेथील कर्मचारी श्री. डोंगरे हे आपल्या मनाला वाटेल त्याप्रमाणे निर्णय घेत असल्याचे आरोपदेखील त्यांनी केला. या ठिकाणी पूर्वी असलेले अधिकारी श्री. चौधरी यांची बदली झाल्यानंतर या ठिकाणी प्रभारी अधिकारी नेमण्यात आले आहेत. यांच्याकडून देखील समाधानकारक उत्तर मिळत नसल्याचे शिंदे यांनी सांगितले.

भूमीअभिलेख कार्यालयामध्ये जमीन मोजणी प्रकरणांसाठी मोठ्या प्रमाणामध्ये आर्थिक व्यवहार होत असल्याच्या तक्रारी वारंवार होत आहेत. या ठिकाणी असलेले कर्मचारी कागदावर वजन ठेवल्यानंतर तात्काळ काम करून देत आहेत. यामुळे तालुक्यातील गोरगरीब जनतेचे प्रचंड हाल होत आहेत. कार्यालयामध्ये त्यांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. फेऱ्या मारूनदेखील अनेक त्रुटी काढून त्यांना पुन्हा पुन्हा येण्याचा मानसिक त्रास दिला जात आहे. याबाबत शासनाने गंभीर दखल घेऊन सदर कार्यालयातील कर्मचाऱ्यांची चौकशी करावी, अशी मागणीदेखील शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते बापू दळवी यांनी केली आहे.

# पोलिसांसाठी आरोग्य तपासणी शिबीर

**। रसायनी । वार्ताहर ।**

खालापूर लायन्स क्लब यांच्या वतीने आणि अपोलो हॉस्पिटल नवी मुंबई आणि नायर हॉस्पिटल मुंबई यांच्या सौजन्याने खालापूर तालुक्यातील पोलिसांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्याचबरोबर शारीरिक तपासणीदेखील झाली.

डोळ्यांमुळेच आपण आपला परिसर पाहू शकतो आणि अनुभवू शकतो. तथापि, कोणत्याही प्रकारच्या डोळ्यांच्या विकारामुळे मोठी गैरसोय होऊ शकते. यासाठी आपण आपल्या डोळ्यांची व आरोग्याची काळजी घेतली पाहिजे, त्यासाठी आम्ही हा उपक्रम राबविला आहे, असे खालापूर लायन शिवानी संतोष जंगम यांनी सांगितले. पोलीस हे चोवीस तास कार्यरत असतात. रात्रंदिवस ते काम करीत असल्याने त्यांच्यात डोळ्यांचे विकार वाढत चालले आहेत. त्यामुळे एखाद्याच्या दृष्टीवर परिणाम होऊ शकतो. म्हणूनच डोळ्यांच्या स्थितीचे लवकर निदान होण्यासाठी नियमित डोळ्यांची तपासणी करणे महत्त्वाचे आहे, तसे न झाल्यास डोळ्यांची कायमची स्थिती किंवा अंधत्वदेखील येऊ शकते, असे खजिनदार किशोर पाटील यांनी सांगितले.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, सपोनि. पवार, गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी, आणि पोलीस पाटील, दिव्यांगांची नेत्र तपासणी करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष शिवानी जंगम, लहू भोईर, किशोर पाटील, भरत पाटील, ला. हरिभाऊ जाधव, कांचन जाधव, महेंद्र सावंत, अशोक पाटील, विक्रांत साबळे उपस्थित होते.



# परतीच्या पावसामुळे शेतकरी चिंतेत

## हातातोंडाशी आलेला घास वाया जाण्याची भीती

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

परतीच्या पावसाच्या भीतीने शेतकऱ्यांवर मोठे संकट निर्माण झाले असून, हातातोंडाशी आलेले पीक नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. काही दिवसांपासून परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचा अंदाज चुकवला असून, वारा, पाऊस हे मोठ्या प्रमाणात येत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

वर्षभर पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहावी आणि पाऊस पडल्याने भातशेती लावली जाते. त्यासाठी लागणारे खत, बियाणे, मजूर आदी खर्चाने शेतकऱ्यांची कंबर मोडून जाते.



भातशेती उत्तम पिकली म्हणून शेतकरी आनंदी होतो. पण, शेवटच्या क्षणाला शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान ही परिस्थिती दरवर्षी आपणास पहावयास मिळते. अशा अनेक कारणांनी शेतकऱ्यांना मोठा धोका निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी भातशेतीला उत्तम पीक आले असून, वरुणराजाची दृष्ट लागली की काय? या विचाराने बळीराजाला चिंतेने ग्रासले असून, परतीच्या पावसाच्या भीतीने तो चिंताग्रस्त झाला आहे.

# दुचाकीची चोरी

**पनवेल :** ८१ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने नवीन पनवेल येथील बँकेच्या समोर दुचाकी पार्क केली. आणि चोरानी ती पळून नेली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अनोळखी ईसमाविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. अरविंद करपे हे सेक्टर आठ खांदा कॉलनी येथे राहत असून त्यांनी नवीन पनवेल येथील जनकल्याण सहकारी बँकेच्या समोरील रस्त्यावर स्कुटी गाडी हँडल लॉक करून ठेवली होती व ते बँकेत गेले. बँकेचे पासबुक भरून ते परत आले असता त्यांना गाडी दिसली नाही. त्यांनी ट्राफिक विभागात गाडीची चौकशी केली मात्र ती सापडून आली नाही. चोरट्यांनी ती चोरून नेली.

# करंजा इन्फ्राविरोधात चक्का जाम आंदोलन



**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील करंजा गावाच्या हद्दीमधील 'करंजा इन्फ्रा' कंपनीत स्थानिकांना काम मिळावे यासाठी पनवेल, उरण 'लॉरी चालक मालक संघटना' आक्रमक झाली आहे. मंगळवार, दि. ८ ऑक्टोबरपासून कंपनीच्या गेटवर चक्का जाम आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

करंजा इन्फ्रा कंपनीमधील ट्रान्सपोर्टचे काम ठेकेदार बाहेरील ट्रान्सपोर्टरकडून करून घेत असल्याने येथील स्थानिकांना काम मिळत नसल्याचा ठपका ठेवत, येथील पोर्टमधील कोळसा वाहतूक करण्याचे काम स्थानिक ट्रान्सपोर्टना मिळाले पाहिजे, अशी मागणी पनवेल, उरण तालुका लॉरी चालक मालक संघटनेनी केली होती.

याबाबत कंपनी प्रशासनाबरोबर स्थानिक लॉरी चालक मालक संघटनेने वारंवार संपर्क साधून मालाची वाहतूक करण्याचे काम येथील स्थानिकांना मिळण्यासाठी प्रयत्न केले होते. परंतु, याला कंपनी प्रशासन जुमानत नाही. यामुळे पनवेल, उरण लॉरी चालक मालक संघटनेत संतापाची लाट पसरली आहे.

येथील लॉरी चालक मालक संघटनेला कंपनी प्रशासनाने सामावून घेण्याची मागणी लावून धरली. परंतु, न्याय मिळत नसल्याने मंगळवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून रोजी गेटसमोर चक्का जाम आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला असल्याची माहिती पनवेल उरण लॉरी चालक मालक संघटनेकडून देण्यात आली आहे.

# अवयव प्रत्यारोपणासाठी आर्थिक मदतीचे आवाहन




**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालुक्यातील देवळे गावातील मुंबई निवासी सखाराम एकनाथ केसरकर हे गेल्या दोन वर्षांपासून लिव्हरचया आजाराने ग्रस्त आहेत. सध्या ते जसलोक हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत. दोन वर्षांपासून घरातील सर्व जे काही होते ते उपचारासाठी खर्च झाले. सध्या त्यांचा आजार बळावला असल्याने तातडीने लिव्हर प्रत्यारोपण करणे आवश्यक आहे. त्यासाठी वीस लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. एवढा मोठा खर्च करणे त्यांच्या कुटुंबाला शक्य नाही. म्हणूनच दानशूर नागरिकांना आर्थिक मदतीची विनंती करण्यात येत आहे. सखाराम केसरकर हे विवाहित असून, त्यांचे वय ४० वर्षे आहे. त्यांना चौदा वर्षांचा मुलगा आणि तेरा वर्षांची मुलगी अशी दोन अपत्य आहेत. दानशूरांनी पुढील बँकेच्या खात्यावर यथाशक्ती आर्थिक मदत करावी तसेच अधिक माहितीसाठी नारायण केसरकर ९८२०९९९४५० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालसुरे यांनी केले आहे.

# तरुण बेपत्ता

**। पनवेल । वार्ताहर ।**

कामठा उरण येथील किराणा मालाच्या दुकानात हा आपल्या वडिलांना सोडून तो पनवेल येथील स्वामी मठ येथे जात असल्याचे सांगून मोटार सायकल घेवून बाहेर पडला तो अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार उरण पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. अजित श्रीरंग हुंबरे (३२) असे या तरुणाचे नाव असून, चेहरा गोल, रंग सावळा, नाक सरळ, डोळे काळे, केस काळे, बांधा सडपातळ, उंची ५ फुट १० इंच असून, अंगात काळ्या पट्ट्याचा ग्रे रंगाचा टी-शर्ट व पायात ऑफव्हाईट रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली आहे. त्याच्या कपाळात जुन्या जखमेची खूण आहे.





# जेएसडब्ल्यूविरोधात बेमुदत उपोषणाचा इशारा

## कारावा ग्रामपंचायत सरपंच, सदस्य आक्रमक

**। गडब । वार्ताहर ।**

पेण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत काराव हद्दीतील बेरोजगार तरुणांना स्थानिक जेएसडब्ल्यू स्टील कंपनीने नोकरीत सामावून घेतलेले नाही, याशिवाय कंपनीने खाडीमध्ये टाकलेले पाईप काढून टाकावे व नैसर्गिक नाल्यांमध्ये झालेला अतिक्रमण दूर करावा, तसेच ग्रामपंचायत हद्द खार कारावी सर्वे नंबर ९३, खार माचेळा सर्वे नंबर ९४ हे कंपनीने खाली करून द्यावे. तसेच ग्रामपंचायत कारावच्या काही सर्व्हे नंबरमध्ये चालू असलेल्या ब्लास्टिंग, वृक्षतोड, उत्खनन, अधिकृत बांधकाम याबाबत घेतलेले ना हरकत परवानगी ग्रामपंचायत कार्यालयाकडे सादर कराव्यात.

या मागण्यांसाठी १४ ऑक्टोबर २०२४ रोजी जेएसडब्ल्यू कंपनीच्या कारावी येथील गेटसमोर ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य व ग्रामस्थ हे आमरण उपोषणास बसणार असल्याची माहिती सरपंच मानसी पाटील व सर्व सदस्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. ग्रामपंचायत कारावच्या हद्दीत डिप्लोमा डिग्री व आयटीआय पूर्ण झालेले विद्यार्थी असतानाही गेले दीड वर्ष कंपनीकडे स्थानिक नोकर भरती व्हावी यासाठी विद्यार्थ्यांची यादी दिली. मात्र, प्रत्येक वेळी कंपनीने टाळाटाळ केली आहे. मात्र, स्थानिकांव्यतिरिक्त इतर तालुक्यातील व इतर राजकीय पुढाऱ्यांच्या सांगण्याप्रमाणे नोकर भरती होत आहे, असे असताना कंपनीने स्थानिकांची भरती करावी. तर, येथील स्थानिक तरुण बेल्हारी येथे जाणार नाहीत. इथेच ते नोकरी करतील आदी मागण्यांसाठी काराव ग्रामपंचायत जेएसडब्ल्यू कंपनीच्या विरोधात बेमुदत उपोषणास सरपंच मानसी पाटील, उपसरपंच दिपाली भोईर, सदस्य संध्या मात्रे, मनोहर पाटील, मनोज म्हात्रे, सीता पाटील, दीपक कोठेकर, जगदीश कोठेकर, कीर्ती म्हात्रे, भाग्यश्री कडू, वैशाली म्हात्रे, परशुराम मोकल, मुक्ता वाघमारे, दिनेश म्हात्रे उपोषण करणार आहेत.

पान १ वरून

## 'नंदनवन' 'इंडिया'चे !

तयार करण्यात आले. मात्र, मधल्या काळात सर्वोच्च न्यायालयाने रखडलेली विधानसभा निवडणूक घेण्याचे आणि लवकरात लवकर राज्याचा दर्जा देण्याचे आदेश दिले. त्यानुसार येथे तीन टप्प्यात विधानसभा निवडणूक घेण्यात आली.

पहिल्या टप्प्यात १८ सप्टेंबर, दुसऱ्या टप्प्यात २५ सप्टेंबर आणि तिसऱ्या टप्प्यात ३ ऑक्टोबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन कश्मीरचा नारा दिला. मात्र हा नारा फेल गेल्याचे आजच्या निकालातून स्पष्ट झाले. १२ पर्यंतच्या आकडेवारीनुसार इंडिया आघाडी ५२, भाजप २८ आणि पीडीपी २ जागांवर आघाडीवर होते. त्यामुळे कल स्पष्ट झालं असून, ओमर अब्दुल्ला पुन्हा मुख्यमंत्री होणार यावर आता फारुख अब्दुल्ला यांनी शिक्कामोर्तब केले आहे. गेल्यावेळी भाजपसोबत सत्ता स्थापन केलेल्या मेहबुबा मुफ्तींच्या पीडीपीचा सुपडासाफ झाला. तर, भाजपला चार जागांचा फायदा झाला आहे. पण, भाजपने जिंकलेल्या सगळ्या जागा या जम्मूमधल्या आहेत. काश्मीर खोऱ्यात भाजपला खातेही खोलता आले नाही. विशेष म्हणजे, भाजपचे जम्मू-काश्मीर प्रदेशाध्यक्ष रवींद्र रैना यांचा नौशेरा मतदारसंघात पराभव झाला आहे. त्यांनी पराभवाची जबाबदारी स्वीकारत पदाचा राजीनामा दिला आहे.

## आज सेझग्रस्तांबाबत अंतिम सुनावणी

दिलेल्या जमीन मिळकती १५ वर्षांत न वापरल्यामुळे शेतकऱ्यांना मूळ किमतीस परत करण्याकरिता अद्याप कार्यवाही न झाल्यामुळे सेझग्रस्त शेतकरी चळवळ संघटनेने रायगड जिल्हा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता लाक्षणिक उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.उरण, पनवेल, पेण तालुक्यातील एकूण ५२३ हून अधिक सेझग्रस्त शेतकरी या लाक्षणिक उपोषणामध्ये सहभागी होणार आहेत.

याबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री, एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत, जिल्हा पोलीस अधीक्षक, तहसीलदार अलिबाग, उपविभागीय अधिकारी पेण, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी पनवेल, तहसीलदार उरण आदी ठिकाणी पत्रव्यवहार केला आहे.

सन २००५-२००६ मधे महाराष्ट्र शासनातर्फे महामुंबई सेझ कंपनीने उरण, पनवेल, पेण तालुक्यामधील जमीन मिळकती सेझ प्रकल्पाकरिता खरेदी करून परस्पर स्वतःच्या नावावर करून घेतल्या. त्यावेळी सेझ स्थापण्याअगोदर विकास आयुक्त (उद्योग) यांनी त्यांचे दि. १६/०६/२००५ रोजीच्या आदेशानुसार सेझ कंपनीने खरेदी केलेल्या जमीन मिळकती १५ वर्षांमधे न वापरल्यास अथवा त्यावरती प्रकल्प उभा न केल्यास संबंधित शेतकऱ्यांनी मागणी केल्यास शेतकऱ्यांना मूळ किमतीला परत कराव्या लागतील.

महामुंबई सेझ कंपनीने जमीन मिळकती ताब्यात घेऊन आज जवळजवळ १७ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे उरण, पनवेल व पेण तालुक्यामधील संबंधित शेतकऱ्यांनी मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम ६३(१) अ अनुसार जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांच्याकडे चौकशी अर्ज दाखल केला आहे. त्याची सुनावणी सुरू होऊन दि. १५ फेब्रुवारी २०२३ रोजी निकालाकरिता प्रकरण ठेवले होते. परंतु, या बाबीस १८ महिने होऊनसुद्धा अपर जिल्हाधीकारी रायगड यांनी निकालपत्र दिले नाही म्हणून ॲड. कुणाल दत्तात्रेय नवाळे यांनी मे. उच्च न्यायालय मुंबई यांजकडे जनहित याचिका दाखल केली होती. त्यावर दि. १४ ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी होऊन उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती फिरदोशी पुनीवाला व बी.पी. कोलाबावाला यांच्या संयुक्त न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांना चार आठवड्यांमधे या प्रकरणाचा निकाल लावण्याचे आदेश दिले आहेत. त्याची पुढील सुनावणी आत्ता दि. ९ ऑक्टोबर रोजी ठेवण्यात आली आहे. त्यामुळे उरण, पेण, पनवेलमधील ५२३ हून जास्त सेझग्रस्त शेतकऱ्यांचे या निकालाकडे लक्ष लागले आहे.

## आमदारांनी मतदारांना वाऱ्यावर सोडलं

यापुढे राजश्री मिसाळ म्हणाल्या, या भागातील तरुणांना नोकऱ्या मिळाव्यात, यासाठी येथील तरुणांनी आमदारांकडे बायोडेटा दिला. परंतु त्यांनी तो बायोडेटा उघडून बघितलाच नाही. त्यामुळे येथील असंख्य तरुण बेरोजगार आहेत. या भागातील अनेकांच्या जमीनी गेल्या आहेत. त्यांच्या न्याय हक्कासाठी शेतकरी लढत आहेत. मात्र त्यांना न्याय मिळत नाही, ही शोकांतिका आहे.

पुढे त्या म्हणाल्या, महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे. अल्पवयीन मुलींपासून महिलांवर अत्याचार केले जात आहे. त्यामुळे आपल्या न्याय हक्कासाठी ही लढाई मतदानातून लढायची आहे. आता बदला घेण्याची वेळ आली आहे. अधिवेशनात आपले प्रश्न मांडणारे नेतृत्व चित्रलेखा पाटील यांच्या रुपाने गेले पाहिजे. या भागातील अनेक प्रश्नांची सोडवणूक चित्रलेखा पाटील करणारच. त्यासाठी त्यांना बहूमतांनी आमदार म्हणून निवडून द्या, असे आवाहन मिसाळ यांनी केले.

## गरज सरो आणि वैद्य मरो

आमच्या नेत्यांचे उंबरठे खासदार सुनील तटकरे यांनी झिजवले होते. त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडूनदेखील आणले होते. त्यामध्ये सर्वाधिक वाटा हा पेण विधानसभा मतदारसंघातील नवनिर्वाचित भाजपा खासदार धैर्यशील पाटील यांचा आहे. त्याच धैर्यशील पाटील यांचे फोटो, त्यांचे नाव निमंत्रण पत्रिकेतून तसचे महायुतीच्या विविध बॅनरवरुन काढून टाकण्यात येत आहे. यासाठी खासदार तटकरे हे सरकारी अधिकाऱ्यांवर दबाव टाकत आहे. 'गरज सरो आणि वैद्य मरो' अशी खासदार तटकरेंची खासीयत राजकारणात पाहायला मिळत आहे. त्यामुळे आता आगामी विधानसभेच्या निवडणुकीत श्रीवर्धन मतदारसंघात तटकरे यांच्या कोणत्याही उमेदवाराचे काम करणार नाही. 'बायकॉट श्रीवर्धन' अशी मोहीम राबवणार असल्याचे घाग यांनी स्पष्ट करुन तटकरे यांच्या विरोधात मोर्चा खोलला आहे.

माणगाव येथे होणारा कार्यक्रम हा आमच्याच सरकारचा आहे. आमचा त्या कार्यक्रमावर अजिबात आक्षेप नाही. मात्र, खासदार तटकरे यांनी मतदारसंघात जे काही कुरघोडीचे राजकारण सुरु केले आहे, त्याला आमचा प्रखर विरोध आहे. आमच्या नेत्यानांही याची जाणीव झाली पाहिजे, यासाठी माणगावच्या कार्यक्रमाला भाजपाची कोणतीही महिला जाणार नाही, असे घाग यांनी सांगितले.

खासदार धैर्यशील पाटील हे खासदार झाल्यापासून खासदार तटकरे यांना राजकीय असुरक्षितता वाटत आहे. त्यांच्या आजवरच्या राजकीय वाटचालीत त्यांनी भल्याभल्यांना वाटेला लावले आहे. जिल्ह्याच्या राजकारणावर फक्त आणि फक्त आपलेच वर्चस्व राहावे, दुसरा कोणी प्रतिस्पर्धी नको, अशी त्यांची भूमिका राहिली असल्याचेही घाग यांनी सांगितले.

आमच्या वरिष्ठ नेत्यांनी सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या भावनांकडे दुर्लक्ष केले तर, त्याचा उद्रेक होईल, असा इशाराही त्यांनी दिला. जिल्ह्याच्या विविध भागातून मला याबाबत विचारणा होत आहे. कार्यक्रमला अजिबात जाऊ नका, अशा सूचना देण्यात येत असल्याकडेही घाग यांनी लक्ष वेधले.

## कंत्राटी डॉक्टर, परिचारिकांना वेतनाची प्रतीक्षा

नसल्याने घरखर्च चालविणेदेखील कठीण होऊन बसले आहे. महिन्याचा आर्थिक ताळमेळ बिघडला असून, अनेकांवर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. शासनाकडून ५० लाखांहून अधिक रुपयांचा निधी न आल्याने वेतन रखडल्याची माहिती रुग्णालयातील प्रशासनाकडून उपलब्ध झाली आहे.

## वरसई सरपंच अपात्र

ग्रामस्थ किरण शिगवण यांनी याबाबत रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे न्याय मागितला होता. याबाबतचा महत्त्वपूर्ण निकाल मंगळवारी (दि. ८) रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिला आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम ३६ नुसार सरपंच किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपसरपंच यांनी पुरेशा कारणांशिवाय त्याबाबत विहित केलेल्या नियमांनुसार कोणत्याही वित्तीय वर्षात पंचायतीच्या सभा बोलावण्यात कसूर केल्यास तो यथास्थिती सरपंच किंवा उपसरपंच म्हणून राहण्यास अपात्र असेल. यासंदर्भात पुरेसे कारण होते की नाही, याबाबत जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतिम असेल, अशी तरतूद आहे.

२६ जानेवारी २०२४ रोजी वरसई ग्रामपंचायतीच्या सरपंच रेखा सचिन पाटील यांनी ग्रामसभा घेतली नाही. याबाबतीत हिंदू स्वराज्य सेनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष किरण शिगवण यांनी या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकड २९ मार्च २०२४ रोजी तक्रार अर्ज दाखल केला होती. या संदर्भात विस्तार अधिकारी, पेण आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद यांनी यथायोग्य चौकशी करून आपला अहवाल जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे सादर केला होता. त्यानुसार रायगड जिल्हाधिकारी यांच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी शिगवण यांनी केलेल्या तक्रारीत तथ्य असल्याचे आढळून आल्याने जिल्हाधिकारी यांनी रेखा पाटील यांना अपात्र ठरवून त्यांना सरपंचपदावरून पदच्युत केले आहे.

# आधार जोडणी अभावी बहिणींची कोंडी

## ■ ६६ हजार महिला लाडकी बहिण योजनेच्या लाभापासून वंचित

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यात १ लाख ११ हजार महिलांचे आधार प्रमाणीकरण होत नसल्याने महिला लाडकी बहिण योजनेपासून वंचित राहिल्या होत्या. वंचित राहिलेल्या ४५ हजार महिलांच्या खात्यांना आधार जोडणी करण्यात बँकांना यश आले आहे. त्यामुळे या महिलांना लाभाची रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र आधार जोडणी अभावी अजूनही ६६ हजार महिला लाडकी बहिण योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या आहेत. यामुळे आता विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर महायुतीच्या उमेदवारांना लाडक्या बहिणीच्या रोषाला सामोरे जावे लागणार आहे.**



रायगड जिल्ह्यातून मुख्यमंत्री लाडकी बहिण योजेसाठी पहिल्या टप्प्यासाठी १ लाख ८१ हजार अर्ज प्राप्त झाले होते. दुसऱ्या टप्प्यात १ लाख ६८ हजार प्राप्त झाले. अशा प्रकारे एकूण ३ लाख ४९ हजार महिलांनी लाडकी बहिण योजनेसाठी नोंदणी केली आहे. सुरवातीला २६ हजार अर्जांमध्ये त्रृटी आढळून आल्या होत्या. नंतर या दूर करण्यात आल्या. ८१८ अर्ज बाद ठरले होते. १४ ऑगस्ट पासून जिल्ह्यात पहिल्या टप्प्यातील लाभार्थी महिलांच्या खात्यावर रक्कम जमा होण्यास सुरूवात झाली. मात्र ज्या खात्यांना आधार जोडणी झालेली नाही अशा खात्यांवर योजनेच्या लाभाची रक्कम जमाच होऊ शकलेली नाही.

जिल्ह्यातील १ लाख ११ हजार महिलांचे अर्ज आधार लिंकेज अथवा सिडींग नसल्याने, लाडकी बहिण योजनेच्या मंजुरीसाठी प्रलंबित राहिले होते. त्यामुळे इच्छूक लाभार्थी महिलांची ठिकठिकाणच्या बँकेच्या शाखांमध्ये गर्दी केली होती. यापैकी ४५ हजार अर्जदार महिलांच्या खात्यांचे आधार जोडणी करण्यात जिल्ह्यांतील बँकांना यश आले आहे. मात्र ६६ हजार खात्यांचे आधार जोडणी अद्याप शिल्लक आहे. त्यामुळे या ६६ हजार महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळू शकलेला नाही.

लाडकी बहिण योजनेच्या लाभाची रक्कम पात्र महिलांच्या थेट बँक खात्यात जमा केली जाते. मात्र लाभ हस्तांतरण करण्यासाठी संबंधित व्यक्तीच्या खात्याला आधार कार्डाची जोडणी आवश्यक आहे. सुरक्षित आणि पारदर्शक माध्यमातून महिलांना योजनेचा लाभ मिळावा आणि पैसे सहज आणि त्वरीत जमा व्हावेत हा आधार प्रमाणिकरणा मागचा हेतू आहे. मात्र लाडकी बहिण योजनेसाठी अर्ज करणाऱ्या लाख भर महिलांच्या खात्यांना आधार जोडणी नसल्याने या महिला लाडकी बहीण योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या आहेत.

लाभार्थी महिलांचे बँक खाते आधार प्रमाणिकरण करण्यासाठी महिला वर्ग मोठया संख्येने बँकांमध्ये येत आहे. दुसरीकडे या कामाला प्राधान्य देण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाकडून दिल्या जात आहेत. अनेक लाभार्थी महिलांची बँक खाती जुनी आहेत त्यांचे आधार प्रमाणीकरण करण्यातच बँक कर्मचाऱ्यांचा वेळ जात आहे. त्यामुळे नियमित कामांवर त्याचा परीणाम होताना दिसत आहे.

### अशी आहे अडचण

**लाभार्थी महिलेचे एकच बँक खाते आधारशी लिंक करता येऊ शकते. त्याचे प्रमाणीकरण होऊ शकते. मात्र लाभार्थी महिलेनी दुसरा बँक खाते क्रमांक तर त्या खात्याला आधार लिंकेज करता येत नाही. त्यामुळे या महिला योजनेच्या लाभापासून वंचित राहतात. त्यामुळे एनपीसीआय पोर्टलवर जाऊन लाभार्थी महिलेच्या बँक खात्याचे आधार सिडींग अथवा डिसिडींग करून घ्यावे लागते.**

# म्होरक्यासह ८ डिझेल चोरांना केली अटक

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबई पोलिस आयुक्तालयासह इतर विविध ठिकाणी डिझेलसह वाहनांचे टायर चोरी करणाऱ्या टोळीच्या म्होरक्यास त्याचे साथीदार अशा एकूण ८ जणांच्या टोळीस नवी मुंबई गुन्हेशाखेने जेरबंद केले आहे.

याप्रकरणी पोलिसांनी टोळीचा म्होरक्या सलमान कलदाणी याच्यासह कमल चंद्रपाल राठोड, शेरसिंग नरफतसिंग राठोड, आकाश चव्हाण, रवी सोनकांबळे, अविनाश चव्हाण, फिरोज नासीर कलदाणी, जुनेद शेख व अशोक मस्के उर्फ कांचा अशा सहा जणांना अटक केली आहे. यातील टोळीच्या म्होरक्याविरोधात नवी मुंबईतील पनवेल, उरण, एपीएमसी, कोपरखैरणे, कामोठे, रायगडमधील रसायनी, खोपोली व नागोठणे पोलीस ठाण्यात अशा स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

गुन्हयातील टोळीचा बंदोबस्त करण्याचे आदेश नवी मुंबईचे पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार गुन्हेशाखेचे सहाय्यक पोलिस आयुक्त अजयकुमार लांडगे, यांनी दिलेल्या गोपनीय माहितीवरुन डिझेल चोरीच्या गुन्ह्यातील म्होरक्या सलमान नासीर कलदाणी यांस सापळा रचून त्याच्यासह सहकाऱ्यांना बेड्या ठोकल्या आहेत. यातील आरोपी सलमान नासीर कलदाणी व त्याचे साथीदार कारने जेएनपीटी रोड, खारघर, पनवेल, वाशी, घोडबंदर रोड इत्यादी ठिकाणी फिरुन रस्त्याच्या कडेला पार्किग करुन ठेवलेल्या ट्रेलर किंवा कंटेनरवरील चालक झोपी गेला असल्याचे किंवा वाहनाजवळ कोणीही नसल्याचे पाहून ट्रकच्या डिझेल टाकीमध्ये पाईप टाळून ते सोबत आणलेल्या कॅनमध्ये भरुन डिझेल चोरी करण्याचा गोरखधंदा करत होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी, पोलीस उपनिरीक्षक मानसिंग पाटील यांच्यासह रूपेश पाटील, सागर रसाळ आदींच्या पथकाने कामगिरी पार पाडली आहे.

# आदर्श पतसंस्थेतर्फे आयोजित शिबिरात ११० जणांची नेत्रतपासणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या अलिबाग शाखेचा २६ वा वर्धापनदिन सोमवारी ( दि.७ ) साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त लायन्स क्लब अलिबाग यांच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील, आदर्श पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, अनंत म्हात्रे, सतीश प्रधान, भगवान वेटकोळी, विलाप सरतांडेल, जगदीश पाटील, प्रकाश देशमुख, मनोज ढगे, परेश भटेजा, विराज ढगे, कल्पेश थळे आदी उपस्थित होते.



या नेत्र तपासणी शिबिरात ११० रुग्णाची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. त्यातील १५ जणांच्या डोळ्यात मोतिबिंदू आढळून आले. या १५ जणांच्या डोळ्यांवर आदर्श पतसंस्थेतर्फे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. आदर्श पतसंस्था नेहमीच अशा प्रकारची मोफत नेत्र शिबिरे लायन्स क्लब अलिबाग यांच्या मार्फत घेत असते. आजपर्यंत या माध्यमातून संस्थेने जवळपास ६०० रुग्णांवर शस्त्रक्रिया करून त्यांना दृष्टी दिली आहे, अशी माहिती आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी दिली.

# पाण्याच्या डबक्यात पडून मुलाचा मृत्यू

**। पनवेल । वार्ताहर ।**

पाण्याच्या डबक्यात पडून १२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना पनवेल तालुक्यातील करंजाडे वसाहतीमध्ये घडली आहे. पनवेल तालुक्यातील करंजाडे वसाहतीमधील सेक्टर ४ साईबाबा मंदिर परिसर स्मशानभूमीजवळ एका पाण्याच्या डबक्यात सोहेल रमजान अन्सारी हा पोहण्यासाठी गेला असता त्याला पाण्याचा अंदाज न आल्याने त्यात तो बुडून मृत्यू पावला आहे. या घटनेची नोंद अकस्मित मृत्यू म्हणून पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# भुयारी गटारे देताहेत अपघाताला निमंत्रण

## ■ गटारावरील झाकणांची दुरवस्था

**। पाताळगंगा । प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील निगडोली गावातील घरातून निघणारे सांडपाण्यासाठी भुयारी गटाराचे काम तीन वर्षापूर्वी पूर्ण झाले. घरातून निघणारे सांडपाणी रस्त्यावर येत असल्यामुळे या ठिकाणी वाहन चालकांना खूप त्रास सहन करावा लागत होता. शिवाय वाहन घसरण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे या ठिकाणी भुयारी गटारे बांधण्यात आली. मात्र वाहनांची सातत्याने वर्दळ असल्यामुळे या ठिकाणी बसविण्यात आलेल्या लोखंडी जाळीच्या झाकणांची दुरवस्था निर्माण झाल्यामुळे अपघताला निमंत्रण मिळत आहे.



निगडोली येथून खोपोली जाण्याचा मार्ग नजिक असल्यामुळे या परिसरातील शेकडो नागरिक याच मार्गाचा अवलंब करीत आहे. परिणामी या रस्त्यावर बांधण्यात आलेले आरसीसी भुयारी गटार आता अपघातांचे केंद्रबिंदु बनत आहे. अनेक ठिकाणी लोखंडी जाळी बसविण्यात आली असून वाहनांच्या वर्तळामुळे यांची दुावस्था निर्माण झाली आहे.

येथील काही तरुणांनी या ठिकाणी जाळी खराब झाली म्हणून यामध्ये झाडाच्या फांद्या ठेवल्या असून यामुळे वाहनचालकांना त्याठिकाणी खड्डा असल्याचे निदर्शनास येताच अपघातावर नियंत्रण करणे सोपे जात आहे. नागरिकांची समस्या सोडविण्यासाठी बांधण्यात आलेल्या भुयारी गटारांमुळे धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे या गटारावरील तुटलेल्या जाळीचे लवकरात लवकर काम करावे अशी मागणी येथील ग्रामस्थ आणी वाहनचालक करीत आहेत.



# महाराष्ट्रासाठी इशारा

हरियाणा विधानसभा निवडणुकांचे निकाल सर्वांनाच धक्का देणारे ठरले आहेत. तिथे भाजपचा पराभव होईल आणि काँग्रेसला थोडेफार का होईना बहुमत मिळेल असेच सर्व जण धरून चालले होते. झाडून सर्व मतदानोत्तर चाचण्यांनी देखील हाच अंदाज व्यक्त केला होता. नव्वद जागांच्या विधानसभेत काँग्रेसला ४५ ते ५० जागा मिळतील असा सरासरी अंदाज होता. काही जणांनी तर ६५ चाही आकडा दिला होता. मंगळवारी मतमोजणीला प्रारंभ झाल्यानंतर पहिल्या तासाभरात तो खरा ठरेल, इतकेच नव्हे तर भाजप पार धुळीला मिळेल असे वाटत होते. काँग्रेसला ७० आणि भाजपला दहा अशा जागा दिसत होत्या. पण सकाळी साडेनऊनंतर चित्र एकदम पालटले. भाजपने इतक्या वेगाने बाजी मारली की काँग्रेसच्या जिलब्या, लाडू आणि ढोल-ताशे गायब झाले. हा मजकूर लिहीपर्यंत भाजपला सुमारे पन्नास जागा मिळतील, तर काँग्रेस चाळीसच्या आतबाहेर राहील असे चित्र आहे. हरियाणात भाजप सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करणार हे स्पष्ट झाले आहे. काँग्रेस आणि त्याच्या समर्थकांच्या डोळ्यात अंजन घालणारा हा निकाल आहे. तीन वर्षांपूर्वी या भागातील शेतकऱ्यांनी दिल्लीत काळ्या कायद्यांना विरोध करणारे आंदोलन केले. साक्षी मलिक व विनेश फोगाट इत्यादी महिला कुस्तीगीरांनी महिला अत्याचारांच्या विरोधात आवाज उठवला. शिवाय, अग्निवीर योजनेमुळे सैन्यात जाऊ इच्छिणारे बहुसंख्य लोक नाराज होते. यामुळे किसान, जवान आणि पहेलवान हे तिघे मिळून भाजपचा पाडाव करणार असे सांगितले जात होते. हरियाणात जाटांची संख्या बावीस टक्के असूनही भाजपने गेल्या दहा वर्षात तेथे खट्टर यांच्या रुपाने बिगरजाट मुख्यमंत्री दिला होता. त्यामुळे जाट समुदाय भाजपवर नाराज होता. त्यातच जननायक जनता या जाटांच्या पक्षाने ऐन निवडणुकीच्या आधी भाजपची साथ सोडली. भाजपमध्ये बंडाळीही खूप होती. त्यामुळे भाजप हरणार हे सर्वांनी जणू गृहित धरलेले होते.

### पराभव खेचून आणला

गेल्या वेळी नरेंद्र मोदींनी येथे पंधरा सभा घेतल्या होत्या. यावेळी ती संख्या केवळ सहा इतकी होती. खट्टर यांना सहा महिन्यांपूर्वी मुख्यमंत्रिपदावरून अचानक काढण्यात आले. त्यानंतर त्यांचे राज्यातील येणे कमी झाले. विनेश फोगाट हिचे हुकलेले ऑलिम्पिक पदक हाही एक भावनात्मक विषय झाला होता. या सर्वांचा परिणाम म्हणून भाजपची पीछेहाट होईल असे वाटत होते. पण भाजपने काँग्रेसवर अत्यंत धूर्तपणे बाजी उलटवलेली दिसते. एक म्हणजे ऐन निवडणुकीच्या तोंडावर आम आदमी पक्षाच्या अरविंद केजरीवाल यांची सुटका करण्यात आली. आपने काँग्रेससोबतची युती अचानक तोडून स्वतंत्रपणे निवडणूक लढवली. याचा काँग्रेसला किती ठिकाणी फटका बसला हे तपासावे लागणार आहे. दुसरीकडे. बाबा रामरहीमचीही पॅरोलवर सुटका करण्यात आली. त्याचा हरियाणाच्या काही मतदारसंघांमध्ये भाजपला उपयोग झाला. उत्तर प्रदेशातून मायावती आणि चंद्रशेखर आझाद हे दोघेजण आले व त्यांनी दुष्यंत चौटाला यांच्या पक्षाशी युती केली. या सर्वांनी मिळून दलित मतांचे विभाजन केले. एरवी ती काँग्रेसला मिळतील असा सर्वांचा अंदाज होता. काँग्रेसला ही गोष्ट लक्षात येईपर्यंत उशीर झाला होता. ऐन निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी अशोक तंवर या आपल्या जुन्या दलित नेत्याला पुन्हा एकवार पक्षात आणले. पक्षातील जुन्या दलित नेत्या कुमारी शैलजा व भूपेंद्रसिंग हुडा यांच्यात तडजोड घडवून आणली. पण या त्यांचा काही उपयोग झाला नाही. दलित व जाट कार्ड वापरण्याच्या नादात इतर छोटे ओबीसी गट त्यांच्यापासून दूर गेले असेही एक विश्लेषण आहे. २०१४ व १९ या दोन लोकसभांना भाजपने दहापैकी दहा जागा जिंकल्या होत्या. यंदा मात्र त्यातल्या पाच जागा जिंकून काँग्रेसने हवा तयार केली. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये अतिआत्मविश्वास निर्माण झाला. या सर्वांचा एकत्रित परिणाम विजयाच्या तोंडातून पराभव खेचून आणण्याचा पराक्रम काँग्रेसने करून दाखवला आहे.

### आघाडीने धडा घ्यावा

मतमोजणीच्या सुरुवातीला काँग्रेसला जबरदस्त आघाडी मिळूनही नंतर भाजपने मुसंडी मारण्याचा हा तिसरा प्रकार आहे. यापूर्वी बिहारमध्ये लालूंचा जनता दल व काँग्रेस यांचे सरकार येऊ शकेल अशी हवा तयार झाली असतानाच अनपेक्षितपणे भाजप व नीतीश यांनी बाजी मारली. गुजरातच्या विधानसभेमध्येही हे घडले होते. आता पुन्हा हरियाणात ते झाल्याने निवडणूक आयोगाची कार्यपद्धती व मतदानयंत्रे याबाबत पुन्हा शंका घेतल्या जातील. पण त्यांना काही अर्थ नाही. हरियाणात विक्रमी किंवा साधा कसाही विजय मिळाला असता तरी महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांना उभारी मिळाली असती. लोकसभेनंतर सलग दुसरा विजय मिळाल्याने राहुल गांधी यांच्या नेतृत्वालाही बळ मिळाले असते. पण आता त्यांना मोठे आत्मपरीक्षण करावे लागणार आहे. इतक्या अनुकूल प्रदेशातही जर विजय मिळवता येत नसेल तर महाराष्ट्र हा अधिकच कठीण आहे. एकनाथ शिंदे सरकारने लाडकी बहीणसारख्या योजनांचा वर्षाव चालवला आहे. दलित व मुस्लिम मते एकगठ्ठा मिळतील असे गृहित धरून चालणार नाही. हरियाणातील मायावती इत्यादींप्रमाणे येथेही प्रकाश आंबेडकर वगैरे मते फोडायला सज्ज आहेतच. याखेरीज महाराष्ट्रात अनेक ठिकाणी बंडखोरी होईल आणि मराठा व ओबीसी आंदोलनांचा उलटसुलट फटका बसेल हे गृहित धरायला हवे. एका अर्थी हरियाणाची लढत होऊन गेली हे बरे झाले. काँग्रेस व आघाडीवाल्यांना सावध होण्यास ही संधी आहे. ती ते घेतात की नाही हे त्यांच्यावर आहे. काँग्रेसने आता जागावाटपात अतिरेकी भूमिका सोडायला हवी. एकूणच महाविकास आघाडीने छोटे व पुरोगामी पक्ष इत्यादींना सामावून घ्यायला हवे. मंगळवारीच जम्मू आणि काश्मीरमधील निकाल आले. तेथे काँग्रेसने दुय्यम स्थान मान्य करून नॅशनल कॉन्फरन्ससोबत आघाडी केली होती. त्याचा फायदा झाला. याचे सविस्तर विश्लेषण आम्ही उद्या करूच. पण तूर्तास या दोन्ही राज्यांतील निकालांचा धडा घेऊन महाविकास आघाडीने आपली महाराष्ट्रातील रणनीती तात्काळ बदलण्याची गरज आहे हे नक्की.

विचार

# संघर्षाचा सन्मान

*मिथुन चक्रवर्ती सध्या दादासाहेब फाळके पुरस्कारामुळे चर्चेत आहेत. बॉलीवूडच्या सुपरस्टार्समध्ये गणले जाणारे मिथुन संघर्षाच्या काळात अनेक रात्री मोकळ्या आकाशाखाली उपाशी झोपले. मात्र अविरत परिश्रमांनंतर त्यांच्या वाट्याला अनेक सन्मान आले. भाजपशी राजकीय संबंध असलेल्या मिथुन यांना दिलेल्या या पुरस्कारामुळे पश्चिम बंगालमध्ये भाजपला किती फायदा होतो, हे समजण्यासाठी आणखी काही काळ जाऊ द्यावा लागेल.*



जनार्दन पाटील

एक काळ असा होता की, अभिनयाच्या दुनियेत नशीब आजमावण्यासाठी मिथुन यांना बराच काळ संघर्ष करावा लागला. मिथुन यांनी स्वतःच्या अडचणींची कहाणी अनेकदा सांगितली आहे. एकदा ते म्हणाले होते, आयुष्यात मी जे काही भोगले, ते इतरांना भोगावे लागू नये. संघर्षाच्या दिवसांमध्ये मिथुन यांनी अनेक रात्री मुंबईच्या फूटपाथवर जागून काढल्या. बॉलिवूडमध्ये प्रवेश केला, तेव्हा त्वचेच्या रंगामुळे त्यांना खूप भेदभावाला सामोरे जावे लागले होते. टॉप अभिनेत्री त्यांच्यासोबत चित्रपट करण्यास नकार देत होत्या. अनेक वर्षे त्यांना हे सहन करावे लागले. लोकांचे लक्ष वळवण्यासाठी त्यांनी अनोख्या 'डान्स मूव्हज'वर काम केले. झीनत अमान या पहिली अभिनेत्री, ज्यांनी मिथुनदांची प्रशंसा केली आणि त्यांच्या 'लूक'चे चांगले वर्णन केले. एका ठिकाणी ते म्हणाले होते, की मला पाहून लोकांच्या अपेक्षा वाढल्या आणि चाळीत किंवा गावात राहूनही आपला मुलगा अभिनेता होऊ शकतो, असे त्यांना वाटू लागले. मी आता सामान्य माणसाचा 'हीरो' झालो होतो. सामान्य माणसातून सुपरस्टार बनणे ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट होती. मला वाटले की, मी नाचलो, तर माझा रंग कोणीही पाहू शकणार नाही आणि तेच झाले. नृत्यामुळे लोक माझा रंग विसरले. माझ्यासारख्या वर्णाच्या नायकाची कल्पनाही कोणी केली नव्हती. झीनत अमान या पहिल्या ए-ग्रेड कलाकार होत्या, ज्यांनी मिथुन यांच्यासोबत काम केले. लोक 'हीरो' म्हणून स्वीकारू शकत नसल्याने मिथुनजींसोबत काम करण्याची कोणाचीच इच्छा नव्हती.

एक काळ असा होता की ते बी-ग्रेड चित्रपटांमधून ए-ग्रेड चित्रपटांकडे जाऊ शकणार नाहीत, असे अनेकांना वाटत होते. चित्रपट जाहीर झाल्यानंतरही अभिनेत्रींनी चित्रपटातून बाहेर पडण्याचे प्रकार अनेकदा घडले. मात्र वास्तव हे होते की एक दिवस मिथून मोठा स्टार बनेल, या भीतीने अनेक स्टार्स असुरक्षित होते. झीनतजींना त्या काळातील नंबर वन हिरोईनचा दर्जा होता. त्यांनी मिथुन यांच्यासोबत काम केल्याने इतर अभिनेत्री त्यांच्यासोबत काम करायला तयार झाल्या. 'तकदीर' या चित्रपटाच्या प्रदर्शनामुळे ते 'ए' श्रेणीचा अभिनेता झाले. मिथुन यांच्या त्या चित्रपटाने त्यावेळी शंभर कोटी रुपयांची कमाई केली होती. पुढे मिथुन हिंदी चित्रपटसृष्टीतील एक दमदार अभिनेता बनले आणि १९८२ मध्ये प्रदर्शित झालेल्या त्यांच्या चित्रपटाने इंडस्ट्रीतील बड्या स्टार्सचा पराभव केला. मिथुन यांनी आतापर्यंत सुमारे साडेतीनशे चित्रपटांमध्ये काम केले आहे. बॉलीवूडमध्ये सर्वाधिक प्रदीर्घ खेळी खेळणाऱ्या अभिनेत्यांपैकी ते एक मानले जातात.

अभिनेत्यापासून स्टारमध्ये झालेल्या मिथुन यांच्या परिवर्तनाची कहाणी खूपच रंजक आहे. १९८० च्या दशकात मिथुन यांचे चित्रपट मोठ्या पडद्यावर कमाल दाखवत नव्हते. त्या वेळी ते 'तकदीर के बादशाह' या चित्रपटाचे चित्रिकरण करत होते. कारकीर्दीतील अपयशाने ते त्रस्त आणि निराश झाले होते. दिग्दर्शक सुभाष यांनी त्याबाबत विचारले तेव्हा ते म्हणाले की एवढी मेहनत करूनही मी काही साध्य करू शकत नाही. त्यानंतर त्यांना 'डिस्को डान्सर' या चित्रपटाची ऑफर मिळाली आणि या चित्रपटाने मिथुन रातोरात स्टार बनले. ही त्या काळातली मोठी गोष्ट होती. मिथुन एक उत्तम अभिनेता असण्यासोबतच बिझनेस आणि राजकारणातही स्टारपेक्षा कमी नव्हते. त्यांचा हॉटेलचा मोठा व्यवसाय आहे. उटीमध्ये त्यांचे सर्वात मोठे हॉटेल आहे. मिथुन चक्रवर्ती यांनी चित्रपट, व्यवसाय आणि इतर व्यवसायांमधून सुमारे चारशे कोटी रुपयांची संपत्ती कमावली आहे.

मिथुन चक्रवर्ती यांना 'मृगया' या पदार्पणातील चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला आहे. याशिवाय त्यांना १९९३ मध्ये 'ताहदर कथा' या चित्रपटासाठी दुसरा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. एप्रिल २०२४ मध्ये त्यांना पद्मभूषण सन्मान देण्यात आला. मिथुन यांच्या चर्चीत चित्रपटांमध्ये डिस्को डान्सर, प्यार झुकता नहीं, स्वर्ग से सुंदर, हम पांच, साहस, वारदात, बॉक्सर, प्यारी बेहना, प्रेम प्रतिज्ञा, मुजरिम यांचा समावेश आहे. अग्निपथ, द कश्मीर फाइल्स आणि द ताश्कंद फाइल्स सारख्या अनेक उत्कृष्ट चित्रपटांमध्ये त्यांनी काम केले. आता भारत सरकारने त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कार देण्याची घोषणा केली आहे. हा पुरस्कार चित्रपटक्षेत्रातील योगदानाबद्दल सरकारकडून दिला जाणारा सर्वोच्च सन्मान आहे. तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार पटकावलेले मिथुन चक्रवर्ती यांनी आपल्या अभिनयाने लोकांच्या मनावर राज्य केले आहे. पश्चिम बंगालमधून आलेल्या अभिनेत्यांमध्ये मिथुन चक्रवर्ती हे एकमेव नाव आहे, ज्यांनी उत्तर भारतातही प्रचंड लोकप्रियता मिळवली. त्यांनी हिंदी, बंगाली, भोजपुरी, उडिया, तेलगू आणि तामिळ भाषेतील ३५० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले. मिथुन ८० आणि ९० च्या दशकात सुपरस्टार होते आणि त्यांनी सहाय्यक भूमिकांमध्येही चमकदार कामगिरी केली. मृणाल सेनच्या मृगया (१९७६), सुरक्षा (१९७९), बिमल दत्त यांच्या कस्तुरी (१९८०), आणि ख्वाजा अहमद अब्बासच्या द नक्सलाइट्स यांसारख्या चित्रपटांमध्ये त्यांनी स्वत: ला एक उत्कृष्ट अभिनेता म्हणून स्थापित केले. मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार मिळण्यालाही मोठा राजकीय अर्थ आहे. त्यांची राजकारणातील सक्रियता गेल्या काही वर्षांमध्ये वाढली आहे. त्यांनी २०१३ मध्ये तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ममता बॅनर्जी यांनी त्यांना राज्यसभा खासदार केले; परंतु मिथुन यांनी राजकारणातून मध्यंतरी ब्रेक घेतला. ते तृणमूल काँग्रेसमधून भाजपमध्ये आले. पश्चिम बंगालमध्ये २०२१ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी मिथुन चक्रवर्ती यांना सोबत आणण्यासाठी भाजपने सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यांनी मार्च २०२१ मध्ये कोलकाता येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. त्याआधी संघप्रमुख मोहन भागवत यांनीही मिथुन यांची अनेकदा भेट घेतली. विधानसभा निवडणुकीत भाजपने त्यांना पक्षाचा स्टार प्रचारक बनवले. पक्षाचा त्यांनी जोरदार प्रचार केला. त्या वेळी राज्यात भाजप सरकार स्थापन करू शकेल, असा विश्वास होता. मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यासह पक्षाच्या सर्व बड्या नेत्यांनी विधानसभा निवडणुकीत भाजपचे सरकार स्थापन करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले; परंतु पक्षाला २९४ पैकी केवळ ७७ जागा मिळाल्या. भाजपला अपेक्षित असलेला विजय मिथुन चक्रवर्ती मिळवून देऊ शकले नाहीत.

विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर भाजपमध्ये अनागोंदी निर्माण झाली. अनेक बड्या नेत्यांनी पक्ष सोडला. यामध्ये मुकुल रॉय, बाबुल सुप्रियो यांचा समावेश होता. लोकसभा निवडणुकीच्या २०२४ च्या प्रचारादरम्यान मोदी यांच्यासह इतर बड्या नेत्यांनी बंगालमध्ये पक्षाला मोठा विजय मिळेल, असा दावा केला होता. भाजपने बंगालमध्ये ४२ पैकी ३५ जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले होते; परंतु २०१९ मध्ये जिंकलेल्या जागांपेक्षाही ते खूप मागे पडले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगालमध्ये १८ जागा जिंकणाऱ्या भाजपला या वेळी फक्त १२ जागा जिंकता आल्या. भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम बंगालमध्ये सरकार स्थापनेचे स्वप्न आहे. पश्चिम बंगाल हे जनसंघाचे संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे गृहराज्य आहे; पण सततच्या पराभवामुळे आणि घसरत्या आलेखामुळे पक्षाचे कार्यकर्ते निराश झालेले दिसतात. २०१४ मध्ये केंद्रात भाजपचे सरकार स्थापन झाल्यापासून मोदी, शहा, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याशिवाय भागवत यांनीही अनेक वेळा पश्चिम बंगालचा दौरा केला आहे. पश्चिम बंगालमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून भाजपच्या नव्या अध्यक्षाचा शोध सुरू आहे. सध्याचे प्रदेशाध्यक्ष सुकांत मजुमदार हे मोदी सरकारमध्ये मंत्री असल्याने पक्ष नव्या प्रदेशाध्यक्षाचा शोध घेत आहे; मात्र पक्षातील नेत्यांमधील अंतर्गत लढाई एवढी तीव्र आहे, की निवड करणे कठीण जात आहे.

आज पश्चिम बंगालमध्ये परिस्थिती अशी आहे, की भाजपच्या बंडखोर नेत्यांनी 'भाजप बचाओ' मंच स्थापन केला आहे. पश्चिम बंगालमधील राजकीय लढा भाजप आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात केंद्रीत झाला आहे. पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी आता अडीच वर्षे उरली आहेत. पश्चिम बंगालमधील खराब राजकीय स्थितीमुळे भाजपला मिथुन चक्रवर्ती यांच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत. गेल्या काही महिन्यांमध्ये मिथुन चक्रवर्ती यांनी अनेक वेळा दावा केला आहे, की तृणमूल काँग्रेसचे ३० पेक्षा जास्त आमदार त्यांच्या संपर्कात आहेत आणि लवकरच राज्यात भाजपचे सरकार स्थापन होईल. पश्चिम बंगालमध्ये भाजपकडे कोणताही मोठा लोकप्रिय चेहरा नाही. बंगालमधील लोकप्रिय आणि भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुलीलाही पक्षाने सामील करण्याचा प्रयत्न केला; परंतु गांगुली त्यासाठी तयार नाही. मिथुन चक्रवर्ती पश्चिम बंगालमधील शहरी आणि ग्रामीण भागात खूप लोकप्रिय आहेत आणि विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपला त्यांच्या लोकप्रियतेतून पुन्हा एकदा राजकीय फायदा मिळवायचा आहे.

आजकाल

# रूपयाचे घसरणे आणि डॉलरचे वधारणे

हेमंत गोळे

जॉनी मेरा नाम हा चित्रपट असेल १९७१ मधील. त्यामधील एका उल्लेखावरून दिसते की तेव्हा डॉलरचा भाव सात रु होता. अठ्ठेचाळीस वर्षांत दुप्पट झाला होता.

समंदे तलाश (तर्काचा घोडा-शिवाजी महाराजांनी केलेला शब्दप्रयोग)

माझ्या संग्रही फळझाडांचा बाग हे एक कदाचित दुर्मिळ असणारे पुस्तक आहे. प्रथम प्रकाशन आहे १९२३ सालचे. या पुस्तकात बरीच रंजक माहिती आहे.

नरेंद्र मोदी यांनी डॉलरची किंमत हा निवडणूक प्रचारामधील एक मुद्दा बनविला होता. त्यांचेपूर्वी हा मुद्दा कोणा नेत्याने अधोरेखित केलेला मला आठवत नाही. त्यांनी तो मुद्दा अधोरेखित केल्यामुळे त्यांचे विरोधक देखील त्या मुद्द्याचा त्यांचेविरुद्ध वापर करणार हे मला तरी स्वाभाविक वाटते.

परंतू नमो आणि नमो विरोधक यांचे पलिकडे जाऊन या मुद्द्यावर विचार केला पाहिजे असे या पुस्तकातील एका माहितीवरून माझ्या लक्षात आले. तो उल्लेख डॉलरच्या किमतीबद्दलचा होता. मला आठवते आहे त्यानुसार गंधकाची किंमत त्यांनी दिली होती. तेंव्हा एक पाउंड गंधकासाठी साडेतीन डॉलर्स आणि त्यासाठी साडे दहा रु मोजावे लागत होते. म्हणजे साडेतीन रुपयांना एक डॉलर होता.

नमो पद्धतीने विचार केला तर रुपया भलताच घसरलेला दिसतो या ९९ वर्षांत. यामधील २४ वर्षे ब्रिटिश सत्ताधारी होते. साधारणपणे १२-१३ वर्षे भाजपा नेतृत्वाखालील सरकार होते. साधारणपणे ५ वर्षे खिचडी सरकारे होती आणि उरलेली ५८ वर्षे निर्विवादपणे काँग्रेस सरकार होते. ३.५ ते ८०+ या घसरणीची जबाबदारी सत्ताधारी असणाऱ्या काळाच्या प्रमाणात वाटली तर स्थूलमानाने असे समजावे लागते की या घसरणीची ५८% जबाबदारी काँग्रेस, २४% ब्रिटिश १२ ते १३% भाजपा आणि ५% खिचडी सरकारे. ही वाटणी रास्त वाटते का ?

पण थांबा ! विचार करा ! या ९९ वर्षांत रुपयाची क्रयशक्ती देखील घसरलेली आहे. ते आपण कुठे लक्षात घेतले? १९२३ सालचे १०.५० रु म्हणजे आताचे किती रु असतील? आणि या काळात डॉलरची किंमत तरी स्थिर राहिली असेल का?

१९२३ च्या तुलनेत एका डॉलरला आता २३-२४ पट किंमत मोजावी लागत आहे. पण ज्या चलनात आपण ही किमत मोजणार त्या चलनाची म्हणजे रुपयाची किंमत २५ पटीने घसरली असेल तर एक डॉलरसाठी आपण प्रत्यक्षात साधारण तेवढीच - थोडी कमीच किंमत मोजतो. परिस्थिती जैसे थे च असते. आणि ही घसरण जर ५० पट असेल तर एक डॉलरसाठी आपण प्रत्यक्षात आधीच्या निम्मीच किंमत मोजतो. म्हणजे रुपया वधारलेला असतो आणि डॉलर घसरलेला असतो.

रुपया किती घसरला हे कसे ठरवायचे? मी यासाठी एक कप चहाची किंमत हे माप सुचवितो. १९७४ मध्ये मी नोकरीला लागलो तेंव्हा चहाचा कप साधारणपणे ५० पैशांना मिळायचा. स्वारगेट पीएमटी डेपो पासल्या एका हाटिलात सर्वात स्वस्त म्हणजे ३० पैशांना मिळायचा. १९२३ मध्ये हाटिलात चहाचा कप केवढ्याला मिळायचा ही माहिती माझ्याकडे नाही. परंतू दुसऱ्या महायुद्धापासून महागाई सतत वाढत गेली हे लक्षात घेता १९२३ मध्ये २५ पैशांना कपभर चहा मिळत असेल समजणे हे चुकीचे ठरणार नाही. आता चहाला १० रु पडतात. म्हणजे रुपया गेल्या ९९ वर्षांत ४० पट घसरला आहे. कदाचित ५० पट देखील घसरला असेल.

समजा १९२३ चे सुमारास चहाचा कप २५ पैशांना मिळत होता. तेंव्हा भारतात आलेल्या अमेरिकन पर्यटकाला त्याच्या एका डॉलरमध्ये १४ कप चहा मिळाला असता. आता फार तर सव्वा आठ कप चहा मिळेल.

डॉलर २५ पट वाढला आणि रुपया ५० पट कमी झाला तर प्रत्यक्षात आपण डॉलरला निम्मीच किंमत मोजतो आहोत की नाहीत? म्हणजे तुलनेने रुपया वधारला आणि डॉलर घसरला असेच समजावे लागते (या वास्तवाची नोंद घेऊन अंतर्वस्त्राची निवड करणे योग्य नाही का ठरणार?). तर नवीन आकलन असे - डॉलरच्या तुलनेत गेली ९९ वर्षे रुपया वधारत आला आहे. डॉलरची वरखाली होणारी किमत म्हणजे नदीच्या पुरामधील अल्पजीवी भोवरे आहेत. प्रवाहाची दिशा रुपया वधारण्याची आणि डॉलर घसरण्याची आहे. आणि रुपया वधारण्याची श्रेयविभागणी अशी ५८% काँग्रेस, २४% ब्रिटिश, १३% भाजपा आणि ५% इतर अशी ढोबळमानाने आहे.

**(साभार)**

लोकसंसद

## तरच एस टी ची प्रतिमा उंचावेल

एस टी महामंडळाने हवाई सुंदरीच्या धर्तीवर एस टी च्या शिवनेरी बसमध्ये 'शिवनेरी सुंदरी' परिचारिका नेमण्याचा निर्णय घेतला आहे. एस टी ला गतवैभव मिळवून देण्यासाठी आणि एस टी महामंडळाची प्रतिमा उंचावण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जाते. हा निर्णय म्हणजे जखम डोक्याला आणि मलम गुडघ्याला असा आहे कारण शिवनेरी सुंदरी नेमून एस टी महामंडळाची प्रतिमा उंचावणार नाही. महामंडळाने एस टी त परिचारिका नेमण्यापेक्षा एस टी ला आवश्यक त्या चांगल्या दर्जाच्या सोई सुविधा पुरवा म्हणजे प्रवाशी पुन्हा एस टी कडे वळतील. आज एस टी ची पार दुरावस्था झाली आहे. सगळ्या डेपोच्या गाड्या खराब आहेत. कुठल्याच डेपोला पुरेश्या गाड्या नाहीत. लोकसंख्या वाढली, प्रवासी वाढले पण त्या प्रमाणात गाड्यांची संख्या वाढली नाही. आहे त्याच गाड्या डबल लाईनवर पाठवतात आणि सारख्या ब्रेक डाऊन होऊन परत येतात. एस टी स्टँड किंवा डेपोमध्ये प्रवाशांना मिळणाऱ्या सोई सुविधांवर तर न बोललेलेच बरे. गेल्या अनेक वर्षांपासून एस टी महामंडळात कर्मचाऱ्यांची भरती झालेली नाही त्यामुळे चालक वाहकांमध्ये प्रचंड तणाव आहे. कर्मचाऱ्यांना पुरेसा आणि वेळेवर पगार मिळत नाही. तुटपुंज्या पगारात कर्मचारी आपल्या कुटुंबाचा डोलारा चालवत आहे. महामंडळाने आधी या गोष्टीत सुधारणा करावी. जर एस टी महामंडळाने प्रवाशांना दर्जेदार सोई सुविधा दिल्या तरच एस टी महामंडळाची प्रतिमा उंचावेल. बस सुंदरी, शिवनेरी सुंदरी सारख्या सवंग घोषणेने नाही.

**- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**९ ऑक्टोबर**

**१८७६ :-** बौध्द धर्माचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पंडित आणि या विषयावरील लेखक धर्मानंद दामोदर कोसंबी यांचा जन्म. बुध्दधर्मीयांच्या 'विसुध्दिमग्ग' या पाली ग्रंथाच्या संपादनासह 'बुध्दलीलासारसंग्रह','बुध्द धर्म आणि संघ', 'समाधीमार्ग','भगवान बुध्द', 'बोधीसत्त्व' असे त्यांचे ग्रंथ मराठीलाही प्रकाशित झाले. **१८९२ :-** लोकहितासाठी लेखणी झिजविणारे गोपाळराव हरी देशमुख तथा 'लोकहितवादी' यांचे निधन. 'प्रभाकर' या वृत्तपत्रातून त्यांनी १०० हून अधिक पत्रे लिहिली. या 'शतपत्रा'तून, प्राचीन भारतीय वैभवाच्या ऱ्हासाला भारतीय लोकच कसे कारणीभूत ठरले याची परखड चिकित्साही त्यांनी केली. **१८९३:-** चित्रपट कथालेखक, बालसाहित्यिक शिवराम श्रीपाद वाशीकर यांचा जन्म. 'भक्त प्रल्हाद', 'कच देवयानी','पंढरीचे वारकरी','संत जनाबाई','सावता माळी', 'न्यायनिष्ठूर रामषास्त्री' या पटकथांची पुस्तके प्रसिध्द. याषिवाय वृत्तपत्रातून त्यांनी 'हिंदी राजकारण अर्थात राष्ट्रीय सभेचा संकलित इतिहास' हे पुस्तक लिहिले. **१९०८:-** बेने इस्त्राएली जातीच्या इतिहासाचे लेखक हाईम शमोएल केहीमकर यांचे निधन. मुंबईतील पहिल्या इस्त्राएली स्कूलचे ते संस्थापक. त्यांनी हिंब्रू भाषेतील प्रार्थना व गीते मराठीत भाषांतरीत केली. तसेच 'मोकाट' या ज्यू ग्रंथकाराच्या ग्रंथातील काही उपयुक्त लेख मराठीत रुपांतरीत केलेत. याषिवाय 'बेने इस्त्राएलांचा इतिहास' हे एक लहानसे पुस्तकही त्यांनी मराठीतून लिहिले. **१९११ :-** साहित्यिक दत्तात्रय विनायक गुप्ते यांचा जन्म. ह्यांची 'छाया आणि छाया','पुराण पुरुषांच्या अडचणी' या कथासंग्रहासह 'हरवलेले तिकिट' हा विनोदी लेखसंग्रह प्रसिध्द झाला आहे. **१९१४:-** चरित्रकार, निबंधकार, कवी आणि बालवाङ्‌मयाचे जनक विनायक कोंडदेव ओक यांचा जन्म. 'लघुनिबंधमाला' हे त्यांचे पहिले पुस्तक. 'पीटर दी ग्रेट','सिकंदर बादशाह','अब्राहम लिंकन' यांची चरित्रे तसेच भारताचा, फ्रेंच राज्यक्रांतीचा इतिहास त्यांनी लिहिला. 'शिरस्तदार' ही सामाजिक कांदबरी व 'आनंदराव' ही सामाजिक कथा आणि 'पुष्पवाटिका' हा दहा वेचक कवितांचा संग्रह याशिवाय मुलांसाठी डझनभर पुस्तक मिळून ४८ पुस्तके त्यांच्या नावावर जमा आहेत. **१९१८:-** वैदिक धर्माचे अभिमानी आणि या विषयावरील एक अधिकार संपन्न लेखक काशिनाथ वामन तथा भाऊशास्त्री लेले यांचे निधन. 'योगवसिष्ठ' या भाषांतरासह रामायण महाभारत, देवी भागवत आदी पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. याषिवाय भाऊनी 'मोदवृत्त, धर्म' ही साप्ताहिक व 'आर्यधर्मदर्पण, आर्यधर्मरहस्य व ज्ञानसाधना' ही मासिके सुरू केली. याषिवाय 'विष्णुपुराण, मानवधर्मषास्त्र' या ग्रंथांचे भाषांतरे, दासोपंताची पदे हे संपादित तर लो टिळक, भारताचार्य वैद्य, पं.सातवळेकर या मान्यवर ग्रंथकारकच्या ग्रंथाची परीक्षणे केली. **१९३० :-** लेखक प्रा. डॉ. वसंत सखाराम जोषी यांचा जन्म. 'भाषा व संषोधन : संषोधन खंड १,२' ह्या ग्रंथासह 'मऱ्हाटी संस्ती : काही समस्या','महानुभाव संत','संषोधक साधना','ज्ञानदेव चिंतन' असे अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिले. **१९३२:-** पुणे विद्यापीठाचे नामवंत ग्रंथपाल, माहितीशास्त्रज्ञ, इतिहास संषोधक, नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे ३३ ग्रंथाचे लेखन संपादन. करणारे नामवंत लेखक डॉ. शांताराम गजानन महाजन यांचा जन्म. 'पुणे शहराचा ज्ञानकोष' यासह ६२ हून तसेच १२५ शोधनिबंध प्रसिध्द. याषिवाय ग्रंथालय शास्त्रावर त्यांनी पुस्तके लिहिलीत. त्यापैकी 'द्विबिंदू वर्गीकरण', 'डेसिमल (दषांष) वर्गीकरण', 'तालिकी करण तात्विक', 'तालिकी करण : प्रात्याक्षिक', 'वर्गीकरण तात्विक', 'वर्गीकरण प्रात्याक्षिक','ग्रंथालया तील संदर्भ सेवा : भाग १ : संदर्भ ग्रंथांचा अभ्यास', 'भाग २: तात्विक', 'ग्रंथालय व्यवस्थापन', 'ग्रंथालय संघटन','कोलन वर्गीकरण : प्रात्यक्षिक इत्यादी महत्त्वपूर्ण पुस्तके. **१९३७:-** सामाजिक घडामोडीवर विविध वृत्तपत्रे, मासिके यातून लेख व काव्य लिहिणाऱ्या लेखिका प्रभावती दत्तात्रय मुळये यांचा जन्म. **१९४३:-**लेखक, पत्रकार प्रकाष भालचंद्र कामतीकर यांचा जन्म. 'स्वप्नगंधा','रंग अनंग','क्षितिजरंग'

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

# ‘भिरा’च्या पाण्यावर पालिकेचा दावा

। पनवेल । प्रतिनिधी ।

शहराच्या वाढत्या लोकसंख्येला पुरेसा पाणीपुरवठा करण्याकरिता महापालिकेने नियोजन सुरू केले आहे. त्यादृष्टीने आवश्यक वाढीव पाणी हे पाताळगंगा नदीतून तसेच भिरा येथील टाटा विद्युत निर्मिती केंद्रातून वीजनिर्मिती केल्यानंतर विसर्ग होणाऱ्या अवजलामधून उपलब्ध होणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांच्याकडे पाठविला आहे. याद्वारे शहराची पाण्याची वाढती गरज भागविली जाणार आहे. नवी मुंबई शहराला २०५५ मध्ये नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी ११७५ दशलक्ष लिटरची आवश्यकता आहे. त्यामुळे पालिकेने भिरा प्रकल्पातील पाण्यावर दावा केला आहे.

सध्या मोरबे धरणातून नवी मुंबई शहराला पाणीपुरवठा करण्यात येत आहे. नवी मुंबई शहराजवळच नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ तसेच शिवडी-न्हावा-शेवा अटल सेतू, सिडकोमार्फत राबविण्यात येणारी सामूहिक गृहनिर्माण योजना यांसारख्या विविध पायाभूत विकास प्रकल्पांची उभारणी होत आहे. त्याचप्रमाणे पालिका क्षेत्रात सिडकोने बांधलेल्या जुन्या इमारती तोडून पुनर्विकासाची कामेही शहरात सुरू आहेत. शासनाने ठाणे जिल्ह्यातील १४ गावांचा नवी मुंबई महापालिकेत नव्याने समावेश झाल्याने शहराच्या लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून पाण्याच्या मागणीतही वाढ होणार आहे. सन २०५५ पर्यंत नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील ४४.२० लक्ष इतक्या वाढीव लोकसंख्येस साधारणत: ११७५ दशलक्ष लिटर पाण्याची गरज भासणार आहे.



### शहराची पाण्याची गरज भागवणार

### ११७५ दशलक्ष लिटरची आवश्यकता

### एकत्रित पाणी आणूनच पाणीपुरवठा शक्य

**महामुंबईसाठी भिरा प्रकल्पातील ऊर्जा निर्मितीनंतरच्या पाण्यावर नवी मुंबई महापालिका, पनवेल महापालिकेबरोबरच सिडकोही दावा करत असून ९० कि.मी. अंतरावरून पाणी आणण्यासाठी या सर्व आस्थापनांनी एकत्रित पाणी आणल्यास त्याचा सर्व महापालिकांना त्याचा फायदा होणार असल्याचे मत जाणकारांकडून व्यक्त करण्यात येत आहे.**

> **भविष्यातील विकास आणि वाढणारी संभाव्य लोकसंख्या विचारात घेऊन पालिकेने आवश्यक पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने गतिमान पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. भिरा प्रकल्पातील विसर्ग होण्यावर पालिकेचा दावा कायम आहे. याबाबत शासकीय पातळीवर सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. – डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

नवी मुंबई महापालिकेने शहराच्या पाणी पुरवठ्याकरिता नवीन जलस्रोत शोधण्यासाठी प्राथमिक सल्लागाराची नेमणूक केली आहे. तसेच पालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समिती गठीत केली आहे. समितीने नवीन जलस्रोत निर्मितीकरिता कार्यवाही करणे संयुक्तिक राहील असे सुचविले होते. त्या अनुषंगाने पालिकेने नेमणूक केलेल्या सल्लागाराने नवीन जलस्रोतासाठी प्राथमिक संकल्पना अहवाल सादर केला होता. आयुक्त तथा प्रशासक यांची ११ सप्टेंबर २०२४ रोजी ठरावास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे.

पाताळगंगा नदीतून व भिरा येथील टाटा विद्युत निर्मिती केंद्रातून वीज निर्मिती केल्यानंतर विसर्ग होणाऱ्या पाण्यामधून पालिका क्षेत्रासाठी पाणी उपलब्ध होण्याबाबतचा प्रस्ताव पालिका आयुक्तांनी कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे कार्यकारी संचालक यांच्याकडे पाठविला आहे.

# जिल्हा रुग्णालयात डायलिसिस उपचार अधिक सक्षम

## आरसीएफच्या सीएसआर अंतर्गत आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द

। रायगड । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड थळ तर्फे रायगड जिल्ह्यातील डायलिसिस रुग्णांना औषधोपचार उपलब्ध व्हावा यासाठी २० लाख रुपयांचे अर्थसहाय्य निर्गमित सामाजिक दायित्वच्या माध्यमातून देण्यात आले आहे. आरसीएफचे प्रभारी कार्यकारी संचालक नितीन हिरडे यांनी आज जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अंबादास देवमाने यांना धनादेश सुपूर्द केला.

यावेळी आरसीएफचे प्रभारी कार्यकारी संचालक (थळ) नितीन हिरडे यांसह महाव्यवस्थापक संजीव हरळीकर, प्रभारी मुख्य व्यवस्थापक महेश पाटील व जनसंपर्क अधिकारी संतोष वझे उपस्थित होते.



रायगड जिल्हा सामान्य रुग्णालयात प्रतिमाह सुमारे ६०० डायलेसिस सेशन्स होत असतात ज्यात जिल्ह्यातील गरजू रुग्णांवर डायलिसिस उपचार केले जातात. या रुग्णांकरिता कंझ्युमेबल्स, सोल्युशन्स व औषधे खरेदीसाठी तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याबाबतचे विनंती पत्र जिल्हा शल्य चिकित्सकांद्वारा आरसीएफला दिले होते.

या महत्वपूर्ण औषधांची रुग्णांसाठीची आवश्यकता लक्षात घेऊन आरसीएफ व्यवस्थापनाने संचालक मंडळाच्या बैठकीत सुमारे २० लाख रुपयांचे अर्थसहाय्य सीएसआर अंतर्गत तात्काळ मंजूर करून घेतले. गरजूंना लाभदायी ठरतील अशा योजनांसह रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळेल अशा योजना प्राधान्यक्रमाने राबविण्यावर आरसीएफचा नेहमीच भर राहिला आहे. सीएसआरच्या माध्यमातून समाज उन्नयनासाठी व्यवस्थापन सातत्याने प्रयत्नशील आहे.

# शिक्षण संस्थाचालकांवर गुन्हा

। पनवेल । वार्ताहर ।

नवीन पनवेल येथील आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ आणि ऋषिकेश शिक्षण प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षांसह इतर कार्यकारिणीतील विश्वस्तांविरोधात बुधवारी खांदेश्वर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पनवेल येथील प्रथम वर्ग न्यायालयाच्या आदेशानंतर पोलिसांनी गुन्हा नोंदवून रितसर चौकशी सुरु केली आहे.

१८ वर्षांनंतर हे विनापरवानगीचे प्रकरण बाहेर आल्याने मागील १८ वर्षांत हजारो विद्यार्थ्यांनी या संस्थेतून शिक्षण मिळवले असून त्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त केली जात आहे. २००६ ते २०२४ या दरम्यान आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ आणि ऋषिकेश शिक्षण प्रसारक मंडळाने ही फसवणूक केल्याचे पोलिसांच्या तक्रारीत म्हटले आहे.

**या संस्थेचे धनराज विस्पुते, संगिता धनराज, देविदास विस्पुते, परिमेला करंजकर, दिलीप कुमार चव्हाण, शोभा दिलीप चव्हाण, महिंद्र विस्पुते, स्मिता विस्पुते, रमेश विस्पुते, वंदना बिरारी, राकेश सोनार, मनोज सोनार, प्रशांत भामरे, विक्रम धुमाळ या विश्वस्तांवर बनावट कागदपत्रांच्या आधारे दस्त बनवून सरकारी कार्यालयांची फसवणूक करणे याबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

सिडको मंडळाने नवीन पनवेल येथील सेक्टर १५ येथील भूखंड क्रमांक ४१ येथील जागा नोकरदार महिलांच्या वसतिगृहासाठी या संस्थेला दिली होती. परंतु शिक्षण संस्थाचालकांनी या भूखंडाचे बनावट दस्त बनवून हा भूखंड शिक्षण संस्थेसाठी खरेदी केल्याचे भासवले. तसेच त्यावर महाविद्यालय व इतर शैक्षणिक संस्थेचे कामकाज सुरु केले.

तसेच ऋषिकेश शिक्षण प्रसारक मंडळाने देवद येथील जागा धनराज विस्पुते यांच्या नावावर असताना ती जागा ऋषिकेश शिक्षण संस्थेच्या नावावर दाखवून शिक्षण विभागासमोर मान्यता घेताना बनावट जागेचे कागदपत्र दाखविण्यात आले.

त्यानंतर त्या जागेवर शैक्षणिक विभाग सुरु केले. येथील शाळेच्या इमारत बांधकामासाठी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासह इतर सरकारी यंत्रणांची कायदेशीर परवानगी घेतली नाही.

# माथेरानमध्ये स्वच्छता सेवा अभियान

। माथेरान । वार्ताहर ।

स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छता ही सेवा अभियान संपूर्ण राज्यभर घेण्यात येत असून माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या वतीने माथेरान शहरात स्वच्छता सेवा पंधरवडा राबविण्यात आला. माथेरान नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थी यांच्यासाठी विविध स्पर्धा आणि माथेरान शहर स्वच्छ ठेवणारे स्वच्छता कर्मी यांची आरोग्य तपासणी तसेच माथेरान शहरातील अनेक भागात स्वच्छता मोहीम अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन यावेळी करण्यात आले होते.

सेवा पंधरवडाअंतर्गत माथेरान शहरात स्वच्छता ही सेवा उपक्रम राबविण्यात आला. माथेरानमध्ये स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता या मोहीमे अंतर्गत माथेरान



नगरपरिषदेच्या वतीने येथील स्वच्छता विषयक कर्मचारी आणि सफाई मित्रांकरिता आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन येथील बैरामजी जिजीभाई रुग्णालयात करण्यात आले होते.

माथेरान शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी महत्वाची भूमिका बजावणाऱ्या येथील स्वच्छता कामगारांची आरोग्य तपासणी शिबिरात करण्यात आली. आरोग्य शिबीर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपाली मिसाळ यांनी यशस्वी रित्या पार पाडले. या आरोग्य शिबिरास डॉ. नितीन सिंग (अस्थिरोग तज्ञ), डॉ. वर्षा सिन्हा सिंग (स्त्रीरोग तज्ञ), डॉ. पठाण शबीर खान (स्त्रीरोग तज्ञ) यांची उपस्थिती होती. तसेच या शिबिरासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ.अजित रॉय आणि ऋषिकेश केंद्रे यांनी विशेष प्रयत्न केले.

त्याचबरोबर माथेरान नगरपरिषदे वीर हुतात्मा भाई कोतवाल शाळेत नगरपरिषदेमार्फत स्वच्छता ही सेवा अभियान आणि स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता विषयी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी पण यामध्ये मोठा सहभाग नोंदवला होता. चित्रकला स्पर्धा निबंध स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून येथे विद्यार्थ्यांनी स्वच्छता संदेश दिला. सदरील स्पर्धा ही यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप अहिरे यांनी मेहनत घेतली. माथेरान शहरातील पिसारनाथ मार्केट, रिगल नाका ते एको पॉईंट परिसर भागात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी स्वच्छता निरीक्षक नरेंद्र सावंत, अन्सार महापुळे आणि ज्ञानेश्वर सदगीर तसेच सर्व सफाई कामगार, घनकचरा व्यवस्थापन कर्मचारी उपस्थित होते. संपूर्ण अभियान आणि स्वच्छता सेवा पंधरवडा उत्तमरीत्या, उत्साहात व आनंदात साजरा केल्याबद्दल मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी सर्वांना धन्यवाद देत आभार मानले.

# महिलेशी असभ्य वर्तन

। पेण । प्रतिनिधी ।

महिलेला पेण साईमंदिर कासार तलाव येथे भेटण्यास बोलविले. तिला सांगण्यात आले की, पक्षाच्या कार्यक्रमाबाबत तुझ्याशी बोलायचे आहे. ती आरोपीला लहानपणापासून ओळखत असल्याने साईमंदिर येथे भेटायला गेली. बोलणे चालू असताना अचानक त्याने महिलेला लज्जा उत्पन्न होईल असे वक्तव्य केले. महिला आपल्या आईसोबत त्याच्या घरी पोहोचली. तेथेदेखील त्च्या आईने व पत्नीने महिलेला शिवीगाळ करून अपमानकारक वक्तव्य करून महिलेला आणि तिच्या आईला धक्काबुक्की करून घरातून चालते केले. याबाबत पेण पोलीस ठाण्यात शादाब नजम भाईजी, त्याची पत्नी आणि त्याची आई यांच्या विरूध्द महिलेच्या खबरीनुसार गुन्हा नोंद केला आहे.

# पायी दिंडीचे रायगडमध्ये स्वागत

। रसायनी । वार्ताहर ।

वसुंधरा पायी दिंडीचे स्व स्वरूप संप्रदाय तर्फे आयोजन करण्यात आले आहे. या वसुंधरा पायी दिंडीचे रायगडमध्ये शुभ आगमन ६ ऑक्टोबर रोजी झाले असून डोने, शेलू, कर्जत, रायगड येथे सायंकाळी झाले. जगद्गुरु श्रींच्या या वसुंधरा पायी दिंडीचे समस्त रायगडकरांकडून भव्य दिव्य स्वागत करण्यात आले. वसुंधरा पायी दिंडीच्या वास्तवाच्या ठिकाणी पर्यावरण जागृती नामफलक, पर्यावरण संवर्धन माहिती, भक्तीजागृती, असे कार्यक्रम भक्तीमय वातावरणात संपन्न झाले. या सोहळा पाहण्यासाठी सर्व रायगडकर मोठ्या संख्येने ठिकठिकाणी उपस्थित होते. या वसुंधरा पायी दिंडी सोहळ्यात हजारो यात्री सहभागी झालेले असून तब्बल ३६० कि.मी. पायी प्रवास करत ऊन, वारा, पाऊस यांची तमा न करता पायी वाटचाल करत जगद्गुरू श्रीच्या जन्मोत्सव दिनी वसुंधरा पायी दिंड्या श्रीक्षेत्र नाणिजधाम येथे दाखल होणार आहेत. वसुंधरा पायी दिंडीसोहळा पाहण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# ‘शेतकऱ्यांनी स्वत:ची विक्री व्यवस्था उभी करावी’

। पोलादपूर । वार्ताहर ।

पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन हा शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. नैसर्गिक शेतीला चांगला भाव मिळत असल्याने सलग ३ वर्षे नैसर्गिक शेतीविषयी कृषि विभाग शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून आपल्या शेतीचे सर्टिफिकेशन करणार आहे. अशा प्रमाणित शेतमालाचे उत्कृष्ट पॅकिंग व ब्रँण्डिंग केल्यास त्यास जागतिक बाजारपेठेत चांगला भाव मिळून शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेती व प्रक्रिया उद्योग करून स्वत:ची विक्री व्यवस्था उभी करावी, हाच शेतीसाठी फायदेशीर उपाय असल्याचे मत तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांनी व्यक्त केली.




पोलादपूर तालुक्यातील पैठण येथे मंडळ कृषी कार्यालयाच्यावतीने डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत तालुकास्तरीय दुसरे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. यावेळी कार्यक्रम अध्यक्ष तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील, प्रमुख मार्गदर्शक कृषी विज्ञान केंद्र सेंद्रियशेती तज्ञ जीवन आरेकर, कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे, कृषी पर्यवेक्षक रविंद्र गुंड, शेतकरी प्रोडयुसर कंपनी प्रमोद चव्हाण, आत्मा प्रकल्पाचे कपिल पाटील, कृषी सहाय्यक मनोज जाधव, चेतन लावंड, पुनम क्षीरसागर, मोनिका पिसाळ, संग्राम साळुंखे तसेच स्थानिक शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते. कृषी विज्ञान केंद्र रोहा शास्त्रज्ञ जीवन आरेकर यांनी नैसर्गिक शेती योजनेतील राबवावयाच्या विविध घटकांची माहिती देताना, सेंद्रिय खते, कीडनाशके तयार करणे. उदा. दशपर्णीअर्क, निमास्त्र, जीवामृत, रक्षक सापळे, बाबत माहिती, नैसर्गिक शेतमाल शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना, शेतकरी प्रशिक्षण, निविष्ठा उत्पादन व जमिनीचे प्रमाणिकरण व विक्री व्यवस्था निर्माण करणे या विषयी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

# उरणमध्ये आर्थिक साक्षरता कार्यक्रम संपन्न

। उरण । वार्ताहर ।

उरण वाणिज्य व कला महाविद्यालयांमध्ये करिअर कट्टा अंतर्गत तसेच सेबी यांच्या माध्यमातून आर्थिक साक्षरता या कार्यक्रमांतर्गत शेअर मार्केट कार्यशाळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील एकूण ७८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. त्यापैकी ५४ विद्यार्थ्यांना सदर कार्यक्रम यशस्वीरित्या ऑनलाईन पूर्ण करण्यामध्ये यश आले.

विद्यार्थ्यांना बचत आणि गुंतवणूक कशी करावी, जर आपण छोट्या छोट्या प्रमाणात एसआयपी, म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक केल्या तर काही कालावधीनंतर मोठ्या प्रमाणात फायदा मिळू शकतो तसेच आपणास मिळालेले थोडे थोडेसे पैसे जर आपण एसआयपी सारख्या ठिकाणी किंवा आवर्ती ठेव योजना मध्ये जर गुंतवणूक केले तर छोटीशी गुंतवणूक भविष्यामध्ये फार मोठी होऊ शकते याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून जगदीश माने यांनी अतिशय उत्तमरित्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी महाराष्ट्र उच्चतंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान केंद्र केंद्राचे प्रमुख यशवंत शितोळे तसेच त्यांचे संपूर्ण टीम यांचे अतिशय महत्त्वाचे मार्गदर्शन लाभले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए. श्यामा यांचे बहुमूल्य मार्गदर्शन मिळाले तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे बहुमूल्य असे सहकार्य मिळाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. प्रा. एच. के. जगताप आणि प्राध्यापिका विनिता तांडेल यांनी काम पाहिले.

## चौकच्या दगडी शाळेत ‘प्रतिबिंब’चे प्रकाशन

। चौक । वार्ताहर ।

सरनोबत नेताजी पालकर यांच्या जन्म गावी चौक येथे १६८ वर्षांची जुनी रायगड जिल्हा परिषदेची प्राथमिक दगडी शाळा असून सदर शाळेच्या शेजारी शासनाने खालापूर तालुक्यातील एकमेव आदर्श शाळा विकसित होत आहे. या शाळेमध्ये १०५ विद्यार्थी असून गावाच्या मध्यवर्ती असलेल्या शाळेत विविध उपक्रम आयोजित केले जात असतात. या शाळेचे मुख्याध्यापक महेंद्र नाईक व सहाय्यक शिक्षक गेल्या दीड वर्षापासून शाळेच ‘प्रतिबिंब’ हे चार पानी मासिक दर महिन्याच्या एक तारखेला माजी विद्यार्थी, दानशूर व्यक्ती यांच्या आर्थिक सहकार्यातून प्रकाशित करीत असतात. रायगड जिल्हा परिषदेमध्ये हा अभिनव उपक्रम राबविला जात असून शिक्षक विद्यार्थी व दानशूर यांचे चांगले सहकारी मिळत आहे. ऑक्टोबर २४ च्या ‘प्रतिबिंब’ चे प्रकाशन शाळेच्या माजी विद्यार्थिनी ज्येष्ठ कवयित्री व गझलकार ज्योत्स्ना पाटील रजपूत यांनी केले.

# उरण बाह्यवळण मार्ग भूसंपादन रखडले

। उरण । वार्ताहर ।

वाहतूक कोंडीवर महत्त्वपूर्ण उतारा असलेल्या उरण बाह्यवळण मार्गात नगर परिषद हद्दीतील जमिनीच्या भूसंपादनाचा अथडळा निमर्ण झाला आहे. यासाठी लागणारा निधीही उपलब्ध नसल्याने हा मार्ग पूर्णत्वास येण्यासाठी २०२५ साल उजाडण्याची शक्यता आहे. त्यामुळे उरणच्या प्रवासी व नागरिकांना आणखी काही महिने या मार्गाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

उरण शहर आणि परिसराचे झपाट्याने नागरीकरण सुरू आहे. उरण हे लोकल, रस्ते मार्ग, जलमार्ग यांनी जोडले गेले आहे. त्यामुळे नागरी वस्ती वाढू लागली आहे. त्यामुळे शहरातील वाहनामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीत भर पडली आहे. उरणच्या सर्व मार्गांवर सततच्या कोंडीने प्रवासी, नागरिक आणि वाहनचालक त्रस्त झाले आहेत.

उरण बाह्यवळण मार्गाचा प्रस्ताव २००१ साली उरण शहरातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून शहराला जोडणाऱ्या उरण पनवेल या मुख्य मार्गालगत मोरा मार्गाला जोडणारा बाह्यवळण मार्ग प्रस्तावित होता. त्याचे भूमिपूजनही करण्यात आले,

> **उरणच्या बाह्यवळण मार्गासाठी जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू आहे. या भूखंडावर कुळांची घरे आहेत. यासाठी निधी उपलब्ध झाल्यानंतर या मार्गाचे काम पूर्ण होईल. – समीर जाधव, मुख्याधिकारी, उरण**

मात्र त्याची अंमलबजावणी झाली नाही. या मार्गात कांदळवन असल्याने त्यांच्या परवानग्या मिळण्यासाठी अनेक वर्षे लागली. त्यामुळे या मार्गाच्या खर्चात वाढ झाली. या मार्गाच्या उभारणीसाठी आवश्यक जमिनीसाठी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा यासाठी प्रयत्न करीत आहेत. मात्र सध्या सिडकोच्या माध्यमातून तयार करण्यात येणाऱ्या या एलिव्हेटेड मार्गाचे काम वेगाने सुरू आहे. या मार्गाला जोडणाऱ्या उरण नगर परिषद हद्दीतील भूखंडावर घरे आहेत. त्यासाठी पनवेलच्या उपविभागीय अधिकाऱ्यांकडून येथील जमिनीच्या अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू आहे. मात्र त्यासाठी लागणारा निधी मिळावा याकरिता शासनदरबारी प्रयत्न सुरू आहेत.

# दागिने चोरणारा अटकेत



। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील वडवली येथे राहणारे वसंत मोतीराम तळपे यांच्या घरात चोरी करणाऱ्या चोराला पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव हेमंत दशरथ मसणे आहे. त्याच्याकडून १५ तोळे वजनाचे १०,५०,००० रूपये किमतीचे सोन्याचे दागिने असा सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. आरोपीला न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

वडवली येथे राहणारे वसंत तळपे यांच्या घरातील सोन्याचे दागिने घेवून चोरांनी पळ काढला होता.

या सदंर्भात नेरळ पोलिसांनी चोरी करणाऱ्या चोरांचा तपास सुरू केला होता. त्यानंतर हा चोर बाजुच्याच गावातील असल्याचे तपासाअंती समोर आले आहे. त्याला पोलिसांनी ताब्यात घेवून अटक केली. त्यांच्याकडील चोरलेले सर्व १५ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने केले हस्तगत केले आहे.

## निसर्ग सौंदर्य पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी

# माथेरानच्या डोंगरांना चढला पिवळा साज

। माथेरान । वार्ताहर ।

हरित तृणांनी पसरलेले मखमालीचे डोंगर सर्वत्र दिसतात पण या महिन्यात निसर्गाची किमया माथेरानमध्ये पहावयास मिळते. हिरवेगार डोंगर पिवळा साज चढवून सोन्यासारखे दिसत आहेत. ही पर्यटकांसाठी निसर्गाने दिलेली भेट आहे. हे पाहण्यासाठी पर्यटक माथेरानमध्ये येत आहेत.

पावसाळी पर्यटन हंगाम संपल्यानंतर ऑक्टोबरमध्ये निसर्गामध्ये आमूलाग्र बदल होताना हमखास दिसतात. परतीचा पाऊस झाल्यानंतर सप्टेंबर महिन्यात सूर्यकिरण माथेरानच्या भूमीला स्पर्श करतात. काही ठिकाणी रिमझिम पाऊस त्यामध्ये डोंगरावर दिसणारे इंद्रधनुष्य पाहून पर्यटक अतिशय आनंदी होतात. पण ऑक्टोबरमध्ये नवरात्री उत्सवात माथेरानच्या सातशे हेक्टरमध्ये सभोवताली पिवळ्या फुलांनी डोंगराचे रुपडे पालटून जाते. या फुलांना सोनकी किव्हा छोटे सुर्यफूल असे सुद्धा म्हणतात.

### पॉईंट्स दिसतात सोनेरी

**पर्यटक माथेरान मध्ये आल्यानंतर हमखास पॉईंटवर नक्कीच जातात. पॉईंट म्हणजे डोंगराचे टोक होय. इथून उंचसखल झाडी, काळ्या दगडींपासून बनलेला डोंगर त्यावर हिरवे तृण आणि या तृणामध्ये उगवलेली सोनकीची सोनेरी फुले. हे मनमोहक दृश्य सर्व पॉईंट्स वरून दिसते बाजारपेठेपासून जवळच असलेल्या इको पॉईंट वरून पर्यटक हे दृश्य न्याहाळत असतात.**



डोंगरांमध्ये असणारे सफेद फेसाळलेले धबधबे, काही ठिकाणी हिरवे गवत आणि त्यामध्ये आलेली ही सोनकी एक निसर्गाचे वरदानच आहे. ज्यावेळेस या सोनकीच्या फुलांवर सूर्यकिरण पडतात. त्यावेळी संपूर्ण डोंगर हा सोन्यासारखा दिसतो. हे दृश्य अतिशय विलोभनीय असल्याने ज्या पर्यटकांना या महिन्याची किमया माहिती आहे. ते आवर्जून पाहण्यासाठी येतात. नैसर्गिक आलेल्या फुलांना सुगंध जरी नसला तरी लांब डोंगरावर ती फुलल्यावर सर्वत्र पसरल्यानंतर हिरव्या डोंगराचे पिवळ्या रंगामध्ये रूपांतर होते. हे दृश्य नवरात्री होईपर्यंत याची डोळा पाहण्याची संधी पर्यटकांना मिळते. या फुलांवर फुलपाखरे बागडताना दिसतात. या महिन्यात दिसणारा निसर्ग म्हणजे मुक्त हस्ताने उधळण केलेली डोंगर माथ्यावरील सोनाकीची फुले. या फुलांवर बागडताना फुलपाखरांचे थवे हमखास दिसतात. चतुर आणि फुलपाखरे यांच्यात हवेत स्पर्धा सुरू आहे की काय असा भास होतो. निसर्ग अभ्यासक हे दृश्य अगदी जवळून न्याहाळतात. हा सोनाकीचा खेळ फक्त वीस दिवस असल्याने पर्यटकांची गर्दी वाढली आहे.

> **या नवरात्रीच्या उत्सवात आवर्जून माथेरान पर्यटन स्थळाला भेट देतो. तो येथील बदललेला निसर्ग पाहण्यासाठी. हे दृश्य येथे फक्त वीस ते पंचवीस दिवस पाहवयास मिळते. ज्यांनी कोणी निसर्गाचे मनमोहक दृश्य पाहिले नसेल अशा पर्यटकांनी याच दिवसात माथेरानला यावे. असे दृश्य पाहण्यासाठी गेली आठ वर्षांपासून आम्ही येतो. – अक्षय सहस्त्रबुद्धे, पर्यटक**

निवडक

## वन्यजीव सप्ताह उत्साहात

**खांब :** खांब बिटातील विविध गावे, शाळा व कॉलेज येथे वन्यजीव सप्ताह विविध प्रकारच्या कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. यावेळी खांब वनपाल आर.एस.गायकवाड, वनरक्षक एस.एन.शिद, वनमजूर एच.एम.मोते, सह्याद्री वन्यजीव रक्षकचे सागर दहिंबेकर, प्रयाग बामुगडे, श्वेता विश्वकर्मा, यश सानप, संकेत पाटील, शुभम सणस, आदेश पाटेकर, मुख्याध्यापक दिपक जगताप, सहा.शिक्षक नरेंद्र माळी, विद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## हर्टबीट स्टुडिओचा वर्धापन

**पेण :** पेण येथील हर्टबीट कराओकेचा दुसरा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी ऑर्गनायझर प्रिती शिरसाट, किशोर पाटील यांनी केले होते.तसेच या कार्यक्रमासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश राजपुत, अस्मिता पाटील, पोलीस उपनिरीक्षक शिल्पा वेंगुर्लेकर, गायक संदीप शहा, माजी नगरसेवक संतोष पाटील, पत्रकार अनिस मनियार, राकेश सिंग अदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन व सरस्वती पुजनाने झाली.

## नेत्र तपासणी शिबीर

**कोलाड :** पुगाव येथे लायन्स क्लब कोलाड लायन्स हेल्थ फाऊंडेशन अलिबाग यांच्या वतीने व ग्रुप ग्रामपंचायत तसेच तंटामुक्त समिती पुगाव ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला रुग्णांनी प्रतिसाद दिला. सदरच्या शिबिरात पन्नासहून अधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली असून सोळा जणांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार असून त्यांना या उपक्रमाच्या माध्यमातून दृष्टी लाभणार आहे.

## आरोग्य शिबिर संपन्न

**रसायनी :** तुराडे ग्रामपंचायत, कॉलेज खारघर तसेच राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष यांच्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कान-नाक-घसा, डोळे, पोटाचा विकार, संधी वात, मूळव्याध, भगंदर, फिशर, हैड्रोसील, सांधे दुखी, मणक्याचे आजार, मास पेशीचे आजार, उच्च रक्तदाब, जुनाट सर्दी, दमा, श्वसनाचे आजार, स्वयरासिस, महिलांचे आजार, व्यंधत्व मानसिक तणाव, निद्रानाश, नेत्र चिकित्सा, मधुमेह अशा आजारांची तपासणी करण्यात आली.

## कायदा साक्षर व्याख्यान

**नेरळ :** मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयातील कर्जत रेल्वे पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील व शहर हद्दीतील विद्यार्थ्यांना नवीन फौजदारी कायदे २०२३ चे प्रशिक्षण तसेच कायदा साक्षर व सायबर सुरक्षा या अनुषंगाने शाळेत व्याख्यान आयोजित केले होते. या कार्यक्रमाला माध्यमिक विद्यालयातील १५५ विद्यार्थी सहभागी झाले होते. मुख्याध्यापक रंगराव राठोड तसेच शिक्षक यशवंत पाडवी, सारुकते, शिक्षिका जाधव, ज्योती सरफळे, सोफीन आदी विद्यार्थी उपस्थित होते.

# आनंदाचा शिधा वाटपाची डोकेदुखी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**गोरगरिबांना सण आनंदात साजरे करता यावेत, यासाठी तीन वर्षांपासून आनंदाचा शिधा ही योजना राज्य सरकारने राबवण्यास सुरुवात केली. मात्र, कधी वाहतूक कंत्राटदाराची दिरंगाई, तर कधी जिन्नस पोहचण्यात होणाऱ्या विलंबाने लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा कधीही सणापूर्वी मिळालाच नाही. या एका योजनेमुळे पुरवठा विभागाच्या अन्य कामांवरही परिणाम होत असल्याने येणाऱ्या दिवाळी सणासाठी आनंदाचा शिधा पाठवू नये, अशी विनंती जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी राज्य सरकारकडे केली आहे.**




आनंदाचा शिधाफ्च्या वाटपासाठी त्यातील समाविष्ट सर्व जिन्नस वेळेत दाखल होणे आवश्यक आहे. गणेशोत्सवानिमित्त जाहीर झालेल्या शिधाचे अद्याप वाटप पूर्ण झालेले नाही. लाभार्थ्यांकडूनही त्यास योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने हा शिधा संपवायचा कसा, हा प्रश्न दुकानदारांना पडला आहे. दुकानदार तालुका पुरवठा अधिकाऱ्यांना यास जबाबदार धरत असून शिल्लक शिधा परत न्या, असे सांगत आहेत. मात्र, पुरवठा अधिकारी शिल्लक राहिलेला शिधा परत नेण्यास असमर्थता दाखवत असल्याने कोणत्याही परिस्थितीत शिधामधील जिन्नस विकण्याचे काम दुकानदारांना करावे लागत आहे. साखर, रवा, गोडतेलाची पाकिटे खराब होत असल्याने दुकानदारांना नुकसान सहन करावे लागत आहे. तीन वर्षांपूर्वी राज्य सरकारने ही योजना सुरू केली, त्यापूर्वी रेशन दुकानदारांना नियमित धान्याचे वितरण, साडी वाटप, आधारकार्डला रेशनकार्ड संलग्न करणे, अशी कामे सर्व्हर डाऊन असतानाही करावी लागत होती. त्यातच शिधा वाटपाचे अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली. मात्र, यात दुकानदारांचे यात आर्थिक नुकसान होत आहे. शिधा वाटपाच्या कामाचा परिणाम रास्तभाव दुकानदारांच्या अन्य कामावरही होऊ लागल्याने दुकानदारही वैतागले आहेत. दर सणाला ही कटकट असल्याने येणाऱ्या दिवाळीत आनंदाचा शिधा पाठवूच नये, असा तगादा दुकानदारही पुरवठा विभागाकडे करू लागले आहेत.

मागील वेळी शिध्यातील जिन्नस विकले न गेल्याने यंदाच्या गणेशोत्सवात १५ टक्के कमी मागणी करण्यात आली होती. जिल्ह्यात लाभार्थी कार्डधारकांची एकूण संख्या चार लाख ६३ हजार ६१० इतकी असताना एकूण तीन लाख ९६ हजार ९९१ इतक्याच लाभार्थ्यांसाठी आनंदाचा शिधा मंजूर करण्यात आला. तरीही जिल्ह्यातील दुकानांमध्ये रवा, चणाडाळ, गोडतेल अशा वस्तू शिल्लक आहेत. गणेशोत्सवानिमित्त रवा, चणाडाळ, गोडतेल, साखरेची १५ लाख ८७ हजार पाकिटे मागवण्यात आली होती. आजच्या तारखेपर्यंत ९७.१८ टक्के जिन्नस दाखल झाले आहेत.

### रायगड जिल्ह्यातील लाभार्थी संख्या

अंत्योदय शिधापत्रिका ८३,५०४
अंत्योदय लाभार्थी – २,५७,३१३
प्राधान्य कुटुंब शिधापत्रिका – ३,७५,४१९
लाभार्थी १४,९८,१९६..
एकूण शिधापत्रिका ४,५८,९२३
एकूण लाभार्थी १७,५५,५०९

### १५ हजार साड्या पडून

कमी उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना साडी वाटपाची योजना राज्य सरकारने सुरू केली होती. प्रत्येक लाभार्थी कुटुंबाला एक साडी मिळणार आहे. लोकसभेच्या निवडणूक आचारसंहितेमुळे हे काम थांबले होते. निवडणूक कार्यक्रम संपल्यावर पुन्हा वाटप सुरू झाले होते, परंतु रायगड जिल्ह्यात साडी वाटपाकडे लाभार्थ्यांनी अक्षरशः पाठ फिरवली असून आतापर्यंत १५ हजार साड्या तशाच पडून असल्याची माहिती पुरवठा शाखेकडून देण्यात आली आहे.

> **गणेशोत्सवाचा ९७ टक्के शिधा आला आहे. त्याचे वाटप सुरू झाले असून त्यास काही वेळ लागणार आहे, असे असताना राज्य सरकारने दिवाळीसाठी आनंदाचा शिधा पाठवला नाही तर बरं होईल. कारण या एका कामामुळे पुरवठा विभागाच्या अन्य कामांवर परिणाम होत आहे. उशिरा शिधा येत असल्याने लाभार्थी देखील तो विकत घेण्याकडे दुर्लक्ष करतात. आलेल्या वस्तू परत पाठवणे शक्य नसल्याने लाभार्थ्यांना वारंवार निरोप पाठवून शिधा घेऊन जाण्यास सांगावे लागते.**
> **– सर्जेराव सोनवणे, जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड.**

# तीन बांगलादेशी महिलांवर पोलिसांची कारवाई

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबई गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कळंबोलीत बेकायदापणे वास्तव्यास असलेल्या ३ बांगलादेशी महिलांविरोधात कारवाई केली आहे.

चमिली पप्पुहशमेर सिखडे, (३८ वर्ष), हमिदा शुकरीशौदत गाझी, (२७ वर्ष) व सलमा मोशियर शेख, (२९ वर्ष) अशी कारवाई केलेल्या बांगलादेशी महिलांची नावे असून या सर्व महिला घरकाम करणाऱ्या असल्याचे पोलिसांनी सांगितले.

नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे,अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, गुन्हेशाखेचे पोलीस उपायुक्त अमित काळे, यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात बेकायदेशीर वास्तव्यास असणाऱ्या बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करण्याचे आदेश अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षास दिले होते.

त्यानुसार एएचटीयु पथकाच्या एपीआय अलका पाटील यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली. रामा नामा भगत चाळ, सेक्टर ०३, कळंबोली गाव येथे बांगलादेशी नागरिक बेकायदेशीरपणे वास्तव्यास असन ते सकाळी कामावर निघुन जात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीनुसार अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाने, पथकासह सकाळी सव्वा सात वाजण्याच्या सुमारास छापा टाकला. यावेळी ०३ महिला मिळुन आल्या.

या महिलांकडे पथकास भारतीय नागरिकत्वाबाबत कोणताही पुरावा अगर कागदपत्रे मिळून न आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे चौकशी केली असता, घुसखोरीच्या मार्गाने भारत बांगलादेश सिमेवरील गस्ती पथकाची नजर चुकवून व स्थानिक मुलकी अधिकाऱ्यांचे पूर्व परवानगीशिवाय व कोणत्याही वैध प्रवासी कागपत्रांशिवाय मागील दहा ते पंधरा वर्षापासुन भारतात प्रवेश करून त्या राहत असल्याचे उघडकीस आले.

# मुरूडमधील खोराबंदर बनलेय तळीरामांचा अड्डा

**। कोर्लई । वार्ताहर।**



मुरुड तालुक्यातील जंजिरा किल्ला पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. हा किल्ला पाहण्यासाठी मुरुड शहरापासून फक्त १ कि.मी. अंतरावर खोरा बंदर आहे. पण या ठिकाणी रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेऊन अनेक तळीरामांनी अड्डा बनविला आहे. या ठिकाणी दारुच्या बाटल्यांचा खच नेहमी दिसून येत असून बाटल्यांच्या फोडलेल्या काचा सापडत असल्याने पर्यटक व स्थानिकांना अपघाताची शक्यता वर्तवली जात आहे.

या बंदरात दिवसभर पर्यटकांची रेलचेल असते. त्यानंतर सायंकाळी वाहतूक बंद केली जाते. एकदा अंधार पडला की या ठिकाणी तळीरामांची पावले दारुच्या बाटल्या, चकणा, पाण्याच्या बाटल्या, सोडा बॉटल व शितपेय घेऊन येऊ लागतात. या ठिकाणी कोणतेही सुरक्षा रक्षक नसल्याने या तळीरामांचे चांगलेच फावते आहे. येतात तर येतात पण दारु पिऊन झाल्यावर काचेच्या बाटल्या फोडून वाटेतच टाकून जातात. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांना व त्यांच्या वाहनांच्या टायरला काचा लागून अपघात होण्याची शक्यता आहे.

सदर ठिकाणी स्वच्छ वातावरण असल्याने पहाटेच्या वेळी मॉर्निंगवॉकला जाणाऱ्यांना ही या कारणांमुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या ठिकाणी स्थानिक मच्छिमार सुद्धा रात्री अपरात्री जा-ये करीत असतात,त्यांना सुद्धा याठिकाणी फुटलेल्या बाटल्यांच्या काचा लागून अपघात होण्याची शक्यता आहे.

बंदर खात्याने या बंदरात येणाऱ्या तळीरामांचा बंदोबस्त करावा अशी मागणी स्थानिक नागरिक व पर्यटकांतून होत आहे.

# ई-मोटार कंपनीच्या इलेक्ट्रीक सायकलची चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

ई-मोटार कंपनीच्या इलेक्ट्रीक सायकलची चोरी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील करंजाडे वसाहतीमध्ये घडली आहे. आयुष ठाकूर हा त्याच्या ताब्यात असलेली १० हजार रुपये किंमतीची ई- मोटार कंपनीची इलेक्ट्रीक सायकल घेवून सेक्टर २ ए येथे गरबा खेळण्यासाठी गेला होता व त्याने बाजूच्या त्याच परिसरात आपली सायकल उभी करून ठेवली होती. कुणीतरी अज्ञात चोरट्याने सदर सायकल चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# उदासीन धोरणामुळे पुनाडे योजनेचे काम संथगतीने

## ■ पाणीपुरवठा योजनेची चौकशी करण्याची मनसेची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**



पुनाडे धरण परिसरातील रहिवाशांना भेडसावणारी पाण्याची समस्या दूर करण्यासाठी जल जीवन मिशन हर घर जल या योजनेच्या माध्यमातून सुमारे १० कोटींचा निधी मंजूर झाला आहे. मात्र शासनाच्या उदासीन धोरणामुळे सदर योजनेचे काम संथगतीने सुरू असून रहिवाशांना दुषित पाणी पिण्यास मिळत आहे.त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याने सदर योजनेची सखोल चौकशी करण्याची मागणी उरण तालुका मनसेच्या वतीने करण्यात आली आहे.

मनसेचे तालुकाध्यक्ष ॲड. सत्यवान भगत यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे उपअभियंता प्रशांत पांढरपट्टे यांच्या दालनात सोमवारी ( दि.७)भेट घेऊन पुनाडे नळ पाणीपुरवठा योजनेची माहिती करून घेतली. यावेळी उपअभियंता प्रशांत पांढरपट्टे यांनी योजनेचे काम सुरू असल्याचे सांगितले. यावेळी ॲड. सत्यवान भगत यांनी त्यांच्या निदर्शनास आणून देताना सांगितले की, उरण पूर्व विभागातील जनतेला भेडसावणारी पाण्याची समस्या दूर करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या देखरेखीखाली (केंद्र ५ कोटी ४४ लाख ५९ हजार ००३-५ रु.तसेच राज्य ५ कोटी ४४ लाख ५९ हजार००३-५ रु. ) सुमारे १० कोटी ८९ लाख १८ हजार रुपये खर्चाची पुनाडे नळ पाणी पुरवठा योजना २०२२ साली मंजूर झाली आहे. सदर योजना ही आपल्या कार्यालयाकडून नियुक्त करण्यात आलेल्या मे.गोरुर इन्फ्रा प्रा.लि.नवी मुंबई तसेच इतर नियुक्त करण्यात आलेल्या ठेकेदारांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे.

परंतु, सदर पाणीपुरवठा योजनेचे काम हे संथगतीने अत्यंत निकृष्ट दर्जाचे शासनाच्या नियमानुसार होताना दिसत नाही. त्यामुळे रहिवाशांना दुषित पाणी पिण्यास मिळत असल्याने रहिवाशांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. एकंदरीत शासनाचा मंजूर झालेला निधी अल्पावधीत वाया जाणार आहे. तरी आपल्या कार्यालयाकडून ठेकेदाराला बिल अदा करण्यात येऊ नये. न पेक्षा जनहितार्थ या विरोधात मनसेच्या माध्यमातून उग्र आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा उपअभियंता प्रशांत पांढरेपट्टे, उप अभियंता नामदेवराव जगताप यांच्याशी चर्चा करताना मनसेचे तालुकाध्यक्ष ॲड. सत्यवान भगत यांनी दिला आहे. यावेळी पिरकोन ग्रामपंचायतचे उपसरपंच दीपक पाटील, तालुका सचिव वाहतूक विभाग विधानसभा सभा सचिव साईराज माळी, कर्नाळा विभाग अध्यक्ष आशिष पगडे उपस्थित होते.

पुनाडे नळ पाणीपुरवठा योजनेचे काम लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी संबंधित ठेकेदाराला सूचना दिल्या असल्याची माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग - पनवेल उरणचे अभियंता प्रशांत पांढरपट्टे यांनी दिली आहे.

# गांजा विक्री करणाऱ्या चौघांवर गुन्हा

**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा पोलिसांनी नशा मुक्त म्हसळा ही मोहीम हाती घेतली असून त्या मोहिमेअंतर्गत गांजा विक्री करणाऱ्या दोन तर गांजाचे सेवन करणाऱ्या २ युवकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

म्हसळा शहरात काही तरुण हे अरली पदार्थ व्यसनाच्या आधीन गेले असल्याची तक्रार पोलिसांना ग्रामस्थांनी केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने म्हसळा पोलिसांनी तत्परता दाखवत शहरात गांजा विकणाऱ्या २ तरुणांना तर गांजाचे सेवन करणाऱ्या २ अशा एकूण चार तरुणांना रंगेहाथ पकडून त्यांच्याकडून ७६,६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीवर एन. डी. पी. एस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप कहाळे यांनी म्हसळा पोलीस ठाण्याचा चार्ज घेतल्यानंतर म्हसळा तालुक्यात शांतता नांदत आहे. यातच आता अमली पदार्थ विरोधात होत असलेली कारवाई पाहून नक्कीच म्हसळा नशामुक्त होणार असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. या कारवाईमध्ये उप पोलीस निरीक्षक डि. व्ही एडवळे व त्यांच्या टीमने उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे.



● पंचायत समिती अलिबाग येथील महिला कर्मचाऱ्यांनी साजरा केला नवरात्रीमधील लाल रंग


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारीवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

● नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.रिसेप्शन (पेमेंट-९०००-१३००० अनुभवानुसार) किमान १-२ वर्षे अनुभव आवश्यक. २. काँटिनेंटल कुक (पेमेंट-२२००० आणि वर अनुभवानुसार) किमान-५ वर्षे अनुभव आवश्यक. अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळात संपर्क साधावा आणि व्हॉट्सॲपवर रेझ्युमे शेअर करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२.

● अलिबाग आणि परिसरातील BSC पदवीधर उमेदवारांना Work From Home पद्धतीने कामकाज करण्याची सुवर्णसंधी त्वरित संपर्क करा. ९६८९८९२१२१

● घरकामासाठी बाई पाहिजे वेळ-सकाळी ८.३० ते १२.३० ठिकाण पंतनगर, अलिबाग संपर्क : ८०९७२०५९३९/९४२२३७२१५४

● सरकारी मान्यताप्राप्त कंपनीत सेवानिवृत्त, शिक्षक, डॉक्टर, गृहिणी यांना रोजगाराची संधी. घरातून/कार्यालय (पुर्ण वेळ/अर्ध वेळ) काम.प्रशिक्षण आणि मार्गदर्शन दिले जाईल. संपर्क : ९९८७१०१९६०

● वर्कशॉपमध्ये मशिन ऑपरेटर आणि सुपरवाईझर पाहिजेत शिक्षण १५ वी पास प्रशिक्षण दिले जाईल. ठिकाण बामणसुरे, चोंढी नंबर - ९१४५४५०२९७/९५७९२५८८९२.

● वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत १० वी १२ वी पास/ नापास पगार १२००० रूपये १२ तास ड्युटी ठिकाण-बामणसुरे, चोंढी नंबर-९१४५४५०२९७/९५७९२५८८९२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## एसटीची बससेवा होणार अधिक सक्षम

# लालपरी धावणार सुसाट

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**राज्याची जीवनवाहिनी असलेल्या एसटीच्या ताफ्यात दोन वर्षांत ५,२५० इलेक्ट्रिक बससह ११,२६० बस गाड्यांची भर पडणार आहे. यापैकी काही गाड्या एसटीच्या ताफ्यात येण्यास सुरुवात झाली आहे. तर, उर्वरित गाड्या लवकरच येणार आहेत. यामुळे मुंबईसह राज्यातील एसटीची बससेवा अधिक सक्षम होणार आहे. राज्याची जीवनवाहिनी म्हणून एसटी ओळखली जाते.**

एसटी महामंडळाच्या ताफ्यात सध्या १४ हजार बस आहेत. त्यापूर्वी एसटीच्या ताफ्यात १८ हजार बसगाड्या होत्या; मात्र मागील तीन वर्षांत नवीन बसगाड्या खरेदी करण्यात आलेल्या नाहीत.



आयुर्मान संपुष्टात आलेल्या बसगाड्या भंगारात काढण्यात येत असल्याने ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी झाली आहे. येत्या काही दिवसांत आणखी दोन हजार गाड्या भंगारात काढण्यात येणार आहेत. त्यामुळे महामंडळाने आपल्या ताफ्यातील बसगाड्यांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.महामंडळाने इलेक्ट्रिक बससोबत साध्या गाड्या वाढण्यावर भर दिला आहे. टप्प्याटप्प्याने राज्यात ५,१५० इलेक्ट्रिक बस येणार आहेत. त्यापैकी ६० बस एसटी ताफ्यात दाखल झाल्या आहेत. ई-शिवनेरीच्या १०० बसपैकी ८६ बस ताफ्यात आल्या असून उर्वरित बस काही दिवसांत येणार आहेत. तसेच, डिझेलवर चालणाऱ्या सहा हजार गाड्या येणार आहेत. यातील २,२०० बसची वर्कऑर्डर झाली. टप्प्याने बस ताफ्यात येणार आहेत. याशिवाय २,५०० बस खरेदीची निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. १,३१० साध्या बस खासगी भाड्याने घेणार असून याची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून डिसेंबर अखेरपर्यंत गाड्या एसटीच्या ताफ्यात येणार आहेत.

### दोन वर्षांत ११,२६० गाड्या येणार

५,१५० इलेक्ट्रिक बसपैकी ६० बस आल्या
ई–शिवनेरी १०० पैकी ८६ बस आल्या
दर महिन्याला सध्या बस ३०० येणार
२,५०० बस निविदा प्रक्रिया सुरू होणार
१,३१० साध्या बस खासगी भाड्याने घेणार

> **एसटीच्या ताफ्यात नवीन गाड्या आल्यानंतर शहरांसह गावखेड्यांतील बससेवेला गती मिळणार आहे. कोरोनापूर्व ६५ लाख प्रवासी संख्या होती. नवीन गाड्या आल्यानंतर तो आकडा गाठणे सोपे होईल.**
> **–अभिजित भोसले, जनसंपर्क अधिकारी, एसटी महामंडळ .**

# एसटी आगार बनलंय गुन्हेगारीचे क्षेत्र

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल एसटी आगार सध्या गुन्हेगारी क्षेत्र बनत चालले असून मोठ्या प्रमाणात लुटमारीचे प्रकार, मारामारीचे प्रकार घडत आहेत. त्यातच दोन महिलांना लुबाडल्याची घटना घडल्याने महिला प्रवासी वर्गामध्ये भितीयुक्त वातावरण आहे.

सुमिता कुथे या आपल्या पतीसह पेण येथे जाण्यासाठी एस.टी.बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेवून अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सहा तोळ्याची गंठण चोरल्याची घटना घडली आहे. तर दुसऱ्या घटनेत प्रतिभा पाटील या सुद्धा पनवेल-अलिबाग या एसटी बसमध्ये चढत असताना त्यांच्या गळ्यातील दिड तोळ्याचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरल्याची घटना घडली आहे.

# ताडी-माडीची भेसळ जोमात; प्रशासन कोमात

**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहरात एसटी स्थानकाच्या मागील बाजूची ओळख आता ताडी-माडी विक्रीचे केंद्र म्हणून नव्याने नावारूपास येत आहे. दारू पिणे खिशाला परवडणारे नसल्याने तळीरामांनी आपला मोर्चा ताडी माडीकडे वळवला आहे. जीवनात मौज घेण्यासाठी तरुणांची ताडी-माडी पिणाऱ्यांमध्ये भर पडली आहे. या ताडी-माडीत जास्तीत जास्त नशा निर्माण व्हावी यासाठी नवसागर, चूना अशा घातक रसायनांचा वापर केला जात असल्याची चर्चा या परिसरात मोठ्या प्रमाणात सुरू आहे.



दारू पिण्याची सुरुवात ही ताडी-माडीपासून होते. माडी हे औषध म्हणूनही लहान मुलांना पाजले जाते. मात्र, ती भेसळ केली जात असल्यामुळे फक्त नशेकरिता प्राशन केली जात आहे. परिणामी, तरुणांची ताडी-माडी पिण्याच्या संख्येत दिवसेंदिवस भर पडत आहे. दारूचे दर हे पन्नास-शंभर रुपयांपेक्षा अधिक असल्याने अनेकांना ते परवडत नाहीत. तुलनेने माडीचा अर्धा लीटरचा एक तांब्या तीस ते चाळीस रुपयांना मिळतो आणि नशा मात्र जवळजवळ दारू इतकीच असते. त्यामुळे सध्या या परिसरात दारूपेक्षा माडीचा धंदाच अधिक तेजीत चालतो. ताडी-माडी ज्या झाडातून काढली जाते, त्याच ठिकाणी विक्रेत्यांमध्ये ती विकली जाते. झाडावरून ताडी-माडी काढण्यापासून ते घशाखाली जाईपर्यंतच्या दोन-तीन टप्प्यांवर ताडी-माडीत भेसळ केली जात असल्याचे बोलले जात आहे. ताडी-माडीत भेसळ होत नसेल तर त्याची नशा जवळपास दारूसारखी कशी, असा सवाल परिसरातून यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

सध्याची भेसळयुक्त ताडी-माडी पिणारा तरुण हा उद्याचा तळीराम असण्याचीच शक्यता अधिक असते. ताडी माडीत होणाऱ्या भेसळीमुळे माडीबाधा होऊन माणसे दगावण्याअगोदर पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनासह सर्व संबंधित यंत्रणांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

ताडी-माडी पिण्यासाठी तळा एसटी स्थानक परिसरात लोक रोज येत असतात. या परिसरात ताडी-माडीची विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असून, त्यामध्ये होणारी भेसळ ही माणसाच्या शरीराला हानिकारक आहे. पोलीस यंत्रणेची या व्यवसायाकडे होत असलेली डोळेझाक ही गंभीर बाब आहे.

माडी ज्या ठिकाणी झाडावरून काढली जाते, त्या ठिकाणापासून ते विक्रेत्यांपर्यंत कोणावरही कोणत्याही प्रकारचे निर्बंध नसल्यामुळे त्यामध्ये नशिल्या पदार्थांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. याबाबत पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन यांनी त्वरित कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# विद्यार्थ्यांच्या करिअरला 'आकार'चे मार्गदर्शन

## ■ विवेक मेहेत्रे यांचा 'चला यशस्वी होऊ या' कार्यक्रम

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील आकार प्रतिष्ठानतर्फे बुधवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन पोलादपूर येथील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्‌घाटन महाड उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी डॉ. ज्ञानोबा बाणापुरे यांच्या हस्ते सकाळच्या सत्रात होणार आहे.

पोलादपूर तालुक्यातील १२ माध्यमिक आणि दोन उच्च माध्यमिक प्रशालांच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी विवेक मेहेत्रे यांचा 'चला यशस्वी होऊ या' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे सेवानिवृत्त महाप्रबंधक सुनील चव्हाण यांचेही विद्यार्थ्यांसाठी बँकेच्या विविध शैक्षणिक कर्जांबाबत मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे.



'चला यशस्वी होऊ या' कार्यक्रमाचे सादरकर्ते विवेक मेहेत्रे हे लेखक, इंजिनिअर, कवी, प्रकाशक, संपादक, प्रशासक, प्रभावी वक्ते, संगणक अभ्यासक, व्यंगचित्रकार, मोटीवेशनल स्पीकर तसेच कोच असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असून, त्यांचे दोन सत्रात मार्गदर्शन होणार आहे.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय सलागरे, उपाध्यक्ष रामदास सकपाळ, सचिव राजाराम शेलार, खजिनदार रवीकांत सकपाळ, सहखजिनदार सुनील चव्हाण, सहसचिव ज्ञानेश्वर उतेकर तसेच कार्यकारिणी सदस्य मेहनत घेत आहेत. पोलादपूर तालुक्यातील सर्व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी या करिअर मार्गदर्शन शिबिराप्रसंगी उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# ग्रामीण भागातील विद्यार्थी होणार डॉक्टर

## ■ नागोठण्यात १ नोव्हेंबरपासून आयुर्वेदिक रुग्णालय होणार सुरू

**। नागोठणे । वार्ताहर ।**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण परिसर सोडला तर रायगड जिल्ह्यातील पहिलेच आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज राज्य व केंद्र सरकारच्या तसेच आयुष मंत्रालयाच्या सर्व आवश्यक त्या परवानग्यानंतर नागोठण्यात १ नोव्हेंबरपासून सुरू होत आहे. या मेडिकल कॉलेजमध्ये देशभरातील विद्यार्थी प्रवेश घेणार आहेत. या मेडिकल कॉलेजमुळे रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे. मात्र, असे असले तरी या मेडिकल कॉलेजच्या १०० बेड असलेल्या हॉस्पिटलचा उपयोग केवळ शिक्षणासाठीच नाही, तर ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेसाठीसुद्धा होईल, असे प्रतिपादन भारतीय एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष किशोर जैन यांनी पत्रकार परिषदेत केले.



नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन/सोशियल सोसायटी चॅरिटेबल ट्रस्ट संचालित श्रीमती शंतीबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयाला (बी.ए.एम.एस) येत्या शैक्षणिक वर्षापासून भारत सरकारच्या नॅशनल कमिशन ऑफ इंडियन मेडिकल सिस्टीम यांच्याकडून १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेस मान्यता मिळाल्याने त्यासंदर्भात माहिती देण्यासाठी महाविद्यालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत किशोर जैन बोलत होते. भाएसोचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिक जैन, संस्थेचे रजिस्ट्रार प्रा. वैभव नांदगावकर, आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. ज्योती जगताप, डॉ. संदेश शिंदे, डॉ. अमेय केळकर, डॉ. रेश्मा मढवी, डॉ. अक्षय ठाकूर, डॉ. कोमल सावंत यावेळी उपस्थित होते.

दरम्यान, तालुक्यातीलच नव्हे तर, जिल्ह्यातील व राज्यातील गरजू विद्यार्थ्यांनी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजला प्रवेश घेऊन आपले भवितव्य घडविण्यासाठी संस्थेने संधी उपलब्ध करून दिलेली आहे. मुंबईपासून तळ कोकणापर्यंत या नवीन महाविद्यालयाचा विद्यार्थ्यांना उपयोग होईल, जैन यांनी सांगितले.

येत्या महिन्यात महाविद्यालातर्फे 'देश की प्रकृती' या भारत सरकारच्या अभियानांतर्गत एक हजार व्यक्तींचे मोफत प्रकृती परीक्षण करण्याचे आम्ही ठरविले आहे. या अभियानात सहभागी व्यक्तींना आहार व जीवनशैलीसंदर्भात मोफत मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे मेडिकल कॉलेजच्या प्राचार्या डॉ. ज्योती जगताप यांनी सांगितले.

# वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम

**पनवेल :** शेतकरी कामगार पक्षाचे कामोठा कार्याध्यक्ष गौरव पोरवाल यांचा अभिष्टचिंतन सोहळा कामोठे येथील गणेश मंदिर मैदानात मोठा जल्लोषात संपन्न झाला. जन्मदिवस निमित्ताने वृक्षरोपण, गरीब गरजू लोकांना साहित्य वाटप, शैक्षणिक मदत व वस्तू दानधर्म केले. अध्यात्मिक भक्ती भावाने सामूहिक पूजा पाठ करून पोरवाल मित्र परिवाराने त्यांच्या दीर्घायुष्यासाठी व उज्वल भविष्यासाठी प्रार्थना केली. गौरव पोरवाल यांना शुभेच्छा देण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवराठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

## जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय रायगड, महाराष्ट्र शासन

खरीप पणन हंगाम २०२४-२५ व २०२५-२६ साठी किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी केलेल्या धान/सीएमआरच्या वाहतूकीचे दर निश्चितीसाठी ई-निविदा सूची

जिल्हाधिकारी रायगड, महाराष्ट्र शासन, अनुभवी निविदाधारकांना स्पर्धात्मक बोली प्रस्तावांना प्रक्रीयेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित करत आहेत.

तपशिलवार निविदा दस्ताऐवजासाठी इच्छुक बोलीदारांनी https://www.mahatenders.gov.in व www.raigad.gov.in या वेबसाईटवर भेट द्यावी.

निविदा ऑनलाईन सादर करावयाची आहे. निविदा फॉर्म विक्री निविदेत सहभागी होण्यासाठी संगणकीय नोंदणी करुन आवश्यक कागदपत्र अपलोड करण्याचा कालावधी दि. ०९/१०/२०२४ ते दि. २९/१०/२०२४ रोजी दुपारी ०२.०० वा. पर्यत आहे.

सही/-
**(किशन जावळे)**
अध्यक्ष
वाहतूक दर निश्चिती जिल्हास्तरीय समिती
तथा
जिल्हाधिकारी रायगड

**क्र. जिमाका/राअ/जाहि/१३७/२०२४-२५**

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.गजानन गोविंद हिरवे यांच्याकडून कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे मेचकरवाडी, ता.कर्जत जि.रायगड येथील मिळकत**

वरील जमिन मिळकत सर्व्हे नं.१६/१ एकूण ०.३९.९० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमिन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : ०९/१०/२०२४

**ॲड.देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो.कडाव ता.कर्जत जि.रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

# चहा टपरीतून अंमली पदार्थांची विक्री

## आरोपी जेरबंद

**। पनवेल । वार्ताहर ।**

उरण-पनवेल महामार्गालगत जासई येथील सुरुंगपाडा येथे चहाची टपरी चालवण्याबरोबरच अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अंमली पदार्थ विरोधी पथकाने छापा मारुन अटक केली आहे. राजन बाळा राठोड (३२) असे या गुन्हेगाराचे नाव असून पोलीस पथकाने त्याच्या चहाच्या टपरीतून २१ ग्रॅम हेरॉईन आणि १ किलो गांजा तसेच चिलीम, रिजला पेपर, गोगो, सिल्वर फॉइल पेपर असा सहा लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मुंबईतील गोवंडी येथे राहणारा सराईत गुन्हेगार उरण-पनवेल महामार्गालगत एका पत्र्याच्या बंदिस्त शेडमध्ये हेरॉईन आणि गांजा या सारख्या अंमली पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत नायडू, निलेश धुमाळ, पोलीस हवालदार तायडे, गणेश पवार, पोलीस कॉन्स्टेबल चालक सोनवूळ यांच्या पथकाने ३ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास जासई सुरुंग पाडा येथील चहाच्या टपरीवर छापा मारला. यावेळी चहाच्या टपरीमध्ये २१ ग्रॅम हेरॉईन, १ किलो गांजा तसेच चिलीम, रिजला पेपर, गोगो, सिल्वर फॉइल पेपर असा सहा लाखांचा अंमली पदार्थ आणि इतर वस्तू आढळून आल्या. अंमली पदार्थ विरोधी पथकाने सर्व मुद्देमाल जप्त करुन आरोपी राजन बाळा राठोड याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याच्याकडे अंमली पदार्थाबाबत चौकशी केली असता, त्याने ओडिशा येथून आणल्याचे कबूल केले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे सावेळे, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक १.रशिदा अस्लम मुजावर २.हफिजा खालिद मालदार ३.जुबेदा नाशिद मुजावर यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| २ | ६ | ०-२३-८० | ०-२८ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/१०/२०२४

**ॲड.समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-गाळा नं.०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळमजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता.कर्जत जि.रायगड
मो नं. ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बेलवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. जयेंद्र यशवंत शिंदे व श्री. मिलींद जगन्नाथ पेढवी यांच्याकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (आर. चौ. मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| बेलवली | ८५ | ३९.१०.०० | ३९१ |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सवास कळावे.

अलिबाग
ता. ०९/१०/२०२४

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स**



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


दि.०८-१०-२०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की आमच्या अशिलांनी मौजे.बोपेले तालुका, कर्जत जिल्हा रायगड येथे हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरवले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे.बोपेले तालुका. कर्जत जिल्हा. रायगड येथील जमिन मिळकत**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| मौजे बोपेले तालुका कर्जत जिल्हा रायगड | २२/१४/अ/२/अ | ५.२०.०० | ५२.०० |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) दिवसात नोंदवावी. सदर नोटीसच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहीत आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सही/-
**श्री.नितिन रा.जाधव**
(वकील) मुंबई उच्च न्यायालय
पत्ता-एल-०६, रूम नं.४०६, नवीन सिडको बिल्डिंग, सेक्टर-१५, रोडपाली, कळंबोली, नवी मुंबई ४१०२०८
दूरध्वनी क्र. ७०२१५३४९९८

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल हे मौजे ताडाचा कोठा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद मिळकत, सदर मिळकतींचे विद्यमान मालक श्री. मोहन रामजी म्हात्रे वगैरे यांचेकडून खरेदी करीत आहेत.

संदर्भित मिळकत निर्वेध व निर्तुटक असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी खरेदीदार यांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास खरेदीदार त्यांचा संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत खरेदीदार यांचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतींचे वर्णन**

मौजे ताडाचा कोठा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नंबर १/१/क, एकूण क्षेत्र ०-८८-० हे. आर., आकार ११-४४ रु. पैकी ०.४४-० हे. आर ही मिळकत.

अलिबाग,
दिनांक : ८.१०.२०२४

सही/-
**(श्री. प्रसाद विजय वर्तक )**
रा. अलिबाग जिल्हा न्यायालय
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे आवळस, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर-पॉ | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| दिपक वसंत पवार<br>अजित वसंत पवार | १ | १ आय | ०-५०-० | ०-५८ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता:-मु.पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक : ०९/१०/२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे. आर. पॉ | रुपये | पैसे |
| सुरेश द्वारकानाथ राजे | ११ | २/ब | ०-४०-०० | ७ | ५५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :-ए विंग, फ्लॅट नं. ४, चौथा मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१ ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

सही/ -
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :-०९/१०/२०२४
मो.नं. ९०२८९८२२७७

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. विजय दिलीप गायकवाड, रा. आसल, पो. चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खालील वर्णन केलेल्या जमीन मिळकतींचे विद्यमान मालक श्री. हरिश्चंद्र काशिनाथ कोळंबे व इतर ३, रा. उक्रुळ, पो. चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मौजे चांधई, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४१/३ | ०-१०-६० | ०-१७ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्‌ंगभूत हक्क हितसंबंधासह मला विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, मृत्यूपत्रांकित दान, कुळवहिवाट, बोजा, वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार माझ्याकडे (खरेदीदार यांचेकडे) प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचेवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ०९/१०/२०२४

अशिलातर्फे
**ॲड. प्रविण गजानन चव्हाण**
मु. डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड
मोबा.नं. ८२३७१०१७१८

# न्याय्य हक्कासाठी एकत्र या : चित्रलेखा पाटील

## चित्रलेखा पाटील यांना निवडून द्या : साम्या कोरडे



। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग-मुरूडसह रोह्यातील रस्त्यांची अवस्था बिकट आहे. आरोग्याचा प्रश्न गंभीर आहे, असे अनेक प्रकारचे प्रश्न भेडसावत आहेत. या भागात विकास हवा असेल, तर चित्रलेखा पाटील यांना आमदार होणे गरजेचे आहे. महिलांनी मताधिक्य देऊन त्यांना निवडून द्या, असे आवाहन शेकाप महाराष्ट्र राज्य विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा साम्या कोरडे यांनी केले. चित्रलेखा पाटील यांनी कोरोना काळात रात्रीचा दिवस करून काम केले. गरीब-गरजूंना आधार दिला. मुली शिकल्या पाहिजेत, यासाठी मुलींना शाळेत जाण्यासाठी सायकल दिली. गोरगरीबांशी बांधिलकी जपत चित्रलेखा पाटील काम करीत आहेत. हे सरकार छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर चालणारे नसून, जुलमी राजांच्या विचारांचे आहे. या राज्यात महिला सुरक्षित नाहीत. आपण जो कर भरतो, त्या करातून लाडकी बहीण योजनेतून पैसे देऊन फसविले जात आहे. ही योजना निवडणुका समोर ठेवून राबविली जात आहे. यापूर्वी अडीच वर्षात सरकारला सुचले नाही का, असा सवाल कोरडे यांनी उपस्थित केला. वाढते कर, महागाई, अन्याय, प्रकल्पाच्या नावाखाली जमिनींच्या लुटीविरोधात आगामी विधानसभा निवडणुकीत बटण दाबून संताप व्यक्त करा, असे आवाहन केले.

जमिनी लुटून काही मोजक्याच लोकांना श्रीमंत करण्याची सरकारची भूमिका आहे, असा आरोप कोरडे यांनी केला.



### नेते मंडळींना पुष्पांजली

शेतकरी, कष्टकरी, कामगारवर्गासाठी लढा देणारे नेते, प्रेरणास्थान स्व. नारायण नागू पाटील, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष स्व. प्रभाकर पाटील, माजी विरोधी पक्षनेते स्व. ॲड. दत्ता पाटील, स्व. सुलभा पाटील, माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करीत मान्यवरांनी त्यांना पुष्पांजली अर्पण केली. दरम्यान, स्व. मीनाक्षी पाटील तसेच मुरूड विभागातील शेकापचे निष्ठावंत कार्यकर्ते स्व. शरद चवरकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### मान्यवरांचे जल्लोषात स्वागत

महिला संवाद मेळाव्यात हजारोंच्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्यासह अन्य मान्यवरांचे आगमन होताच महिलांनी उभे राहून त्यांचे जल्लोषात स्वागत केले. सुरुवातीला त्यांचे प्रवेशद्वारासमोर औक्षण करण्यात आले.

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यातील अनेक भागात पाण्याचा प्रश्न आहे. पाण्याच्या अनेक योजना राबवूनदेखील येथील महिला पाण्यासाठी वणवण करीत आहेत. जमिनी प्रकल्पाच्या नावाखाली घेऊनही त्यांना योग्य दर दिला जात नाही. रोजगारापासून येथील तरुण वंचित आहेत. आपल्या न्याय्य हक्कासाठी महिलांनी शेकापचा लाल बावटा घेऊन लढायला पाहिजे. समाज घडविण्याचे काम महिलाच करू शकतात. त्यासाठी महिलांनी एकत्र यावे, असे आवाहन शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी केले.

चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, गेल्या अनेक दिवसांपासून महिला संवाद मेळावा सुरु केला आहे. या मेळाव्याला महिला वर्गाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महिलांनी महिलांच्या न्याय्य हक्कासाठी एकत्र येण्यासाठी घेतलेल्या या मेळाव्याला प्रचंड गर्दी होत आहे.

दैनंदिन वापरातील कांदा, बटाटा, लसणाचे दर गगनाला भिडले असताना सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून पंधराशे रुपयांत ओवाळणी देऊन अक्षरशः महिलांची फसवणूक केली आहे. आगामी निवडणुकीत मते मिळविण्यासाठी त्यांचा हा प्रकार सुरु आहे.

बदलापूरसह उरण येथील महिलांच्या अत्याचाराच्या व हत्येच्या घटना घडल्या. या घटनेनंतर महिला सुरक्षित आहेत का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सरकारने महिला सुरक्षेच्या दृष्टीने पावले उचलणे गरजेचे आहे. या भागात जमिनीसह पाण्याचा प्रश्न आहे. जलजीवन योजना आल्या. परंतु, त्यात कंत्राटदारांचा फायदा झाला. मात्र, विहिरी आजही कोरड्याच आहेत. स्थानिकांना रोजगार मिळावा यासाठी कंपन्यांनी प्रशिक्षण केंद्र उभारावे. शेतजमिनीला चांगला दर मिळाला पाहिजे. यासाठी महिलांनी एकत्र येण्याची गरज आहे.

पाण्याबरोबरच रोजगाराचे प्रश्न सोडविण्यासाठी शेकाप कटिबद्ध राहणार आहे. शेकाप नेत्या माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील, माजी आ. पंडित पाटील यांनी या भागाचा विकास केला आहे. अनेक प्रश्न या भागातील सोडविले आहेत. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून या भागाचा विकास केला जाईल, अशी ग्वाही चित्रलेखा पाटील यांनी यावेळी दिली.

## शेकापला मत देण्याचा निश्चय करा : निता गिदी



। अलिबाग । प्रतिनिधी ।

माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांनी आमदार, मंत्री असताना या भागातील अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. मेळावे, आंदोलनाच्या रुपाने महिलांना एकत्र करण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत चित्रलेखा पाटील काम करीत आहेत. त्यादेखील मेळाव्याच्या माध्यमातून समाजाला जागरुक करण्याचे काम करीत आहे. शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाने अनेक लढे दिले आहेत. शेतकऱ्यांच्या गिळंकृत केलेल्या जमिनी शेकापने मिळवून देण्याचे काम केले आहे.

राज्यात महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर होऊ लागला आहे. महिलांना एकटीने बाहेर पडणेदेखील कठीण होऊन बसले आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाला मतदान करण्याचा निश्चय करा, असे आवाहन मुरूड पंचायत समितीच्या माजी सदस्या निता गिदी यांनी केले.





### महिलांचा सन्मानपत्र देऊन गौरव

महिला संवाद मेळाव्याच्या निमित्ताने पंचक्रोशीतील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. राजकीय, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, व्यावसायिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विभागातील तीसहून अधिक महिलांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.









# स्वप्निल कुसाळेच्या वडिलांचा सरकारवर आरोप

## एक कोटीऐवजी पाच कोटी बक्षिसाची केली मागणी

। मुंबई । वृत्तसंस्था ।

कोल्हापूरच्या स्वप्निल कुसाळेनं यंदाच्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५० मीटर रायफल स्पर्धेत कांस्य पदक जिंकून इतिहास घडवला. महाराष्ट्रासाठी खाशाबा जाधव यांच्यानंतर पहिल्यांदाच एखाद्या खेळाडूने ऑलिम्पिक पदकाला गवसणी घातली. हे पदक जिंकल्यानंतर महाराष्ट्र सरकारने स्वप्नील कुसाळेला एक कोटींचे बक्षीसही जाहीर केले. पण आता स्वप्नील कुसाळेला एक कोटीऐवजी पाच कोटींचे बक्षीस मिळावे, अशी मागणी त्याचे वडील सुरेश कुसाळे यांनी केली आहे. तसेच, यावेळी त्यांनी राज्य सरकारवर पक्षपाती असल्याचा अप्रत्यक्ष आरोपही त्यांनी केला आहे.

सुरेश कुसाळे यांनी पत्रकार परिषदेत स्वप्नील कुसाळेला ५ कोटींचे बक्षीस मिळावे, अशी मागणी केली आहे. स्वप्नीलला पदक मिळाल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी १ कोटी रुपयांची मदत जाहीर केली होती. पण ती तोकडी आहे, अशी आमची भूमिका होती. दोन दिवसांपूर्वी मंत्रिमंडळाने ५ कोटी सुवर्णपदक विजेत्याला, ३ कोटी रौप्य पदक विजेत्याला, २ कोटी कांस्य पदक विजेत्याला जाहीर केले. पण हे सरकारने ऑलिम्पिक सामने



चालू होण्यापूर्वीच जाहीर करायला हवे होते, असे सुरेश कुसाळे म्हणाले. दरम्यान, स्वप्नील सामान्य घरातला असल्यामुळेच त्याला कमी बक्षीस दिले, असा दावा सुरेश कुसाळे यांनी केला आहे. आता मला वाटायला लागले आहे की, स्वप्नील एका सामान्य कुटुंबातला आहे, त्याला राजकीय पाठिंबा नाही म्हणून तुम्ही त्याला एवढे तोकडे बक्षीस दिले का? हाच मुलगा एखाद्या मंत्र्याचा किंवा आमदाराचा असता, तर तुम्ही काय केले असते? माझी मागणी आहे की, राज्य सरकारने किमान त्याला ५ कोटी रुपये बक्षीस द्यावे. बालेवाडीपासून जवळ फ्लॅट मिळावा, तिथल्या रेंजला स्वप्नीलचे नाव द्यावे अशा अनेक मागण्या आहेत. आगामी काळात त्याला सुवर्णपदक जिंकायचे आहे, अशा मागण्या सुरेश कुसाळे यांनी मांडल्या. दरम्यान, अद्याप स्वप्नीलचा विधानभवनात सत्कार झाला नसल्याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली. वर्ल्डकप जिंकल्यानंतर पाचव्या दिवशीच विधानभवनात महाराष्ट्राच्या तीन खेळाडूंना बोलवून ११ कोटींचे जाहीर केलेले बक्षीस त्यांना दिले. त्यांना ऑलिम्पिक पदकाची काही किंमत आहे की, नाही, अशा शब्दांत कुसाळेंनी नाराजी व्यक्त केली. स्वप्नीलचा आगामी काळातला खर्च खूप जास्त आहे. त्यामुळे ५ कोटींशिवाय पर्याय नाही. अंदाजे २०२८ पर्यंत त्याला लागणारा खर्च ३ कोटींपर्यंत जाईल. आता त्याला साधी बंदूक घेऊन चालणार नाही. त्याला चांगल्या प्रकारची बंदूक घ्यावी लागेल. दिवसाला त्याला २५०-३०० काडतुसे फायर करावी लागतील. त्या एका काडतुसाची किंमत १०० रुपयांपर्यंत असते. त्यामुळे एका दिवसाचा फक्त काडतुसांचा खर्च ३० हजारापर्यंत जातो. नेमबाजीचा हा खर्च आमच्यासारख्या सामान्य माणसाला परवडणारा नाही. जर शासन इतकं उदासीन असते हे मला माहिती असते, तर मी माझ्या मुलाला नेमबाजी करण्यासाठी पाठवलं नसते, असे ते म्हणाले.

## ‘हाँगकाँग सिक्सेस’ स्पर्धा पुनरागमन करणार



। मुंबई । वृत्तसंस्था ।

एकेकाळी मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा समावेश असलेली ‘हाँगकाँग सिक्सेस’ स्पर्धा पुनरागमन करत आहे. टी २० क्रिकेटचा मागमूसही नसताना क्रिकेट चाहत्यांना झटपट खेळाची पर्वणी मिळवून देणारी स्पर्धा असं या स्पर्धेचं वर्णन केलं जातं. तब्बल ७ वर्षांनंतर या स्पर्धेचं पुनरागमन होत आहे. विशेष म्हणजे या स्पर्धेत भारताचा संघ खेळणार असल्याचं आयोजकांनी म्हटलं आहे.

हाँगकाँग सिक्सेस स्पर्धेत प्रत्येक संघात केवळ सहाच खेळाडू असतात. विकेटकीपर आणि गोलंदाज हे दोन वगळता अन्यत्र केवळ चार खेळाडूच क्षेत्ररक्षणासाठी उपलब्ध असतात. प्रत्येक संघाला पाच षटकं मिळतात. विकेटकीपर वगळता बाकी सगळे एकेक षटक टाकू शकतात. फलंदाज वैयक्तिक ३१ धावांवर पोहोचल्यानंतर त्याला डाव सोडावा लागतो. पण संघाचा ऑलआऊट झाला किंवा सगळेच फलंदाज निवृत्त झाले तर ३१ वर डाव सोडलेला फलंदाज पुन्हा खेळायला येऊ शकतो. यामुळे तळाचे फलंदाज एकेरी-दुहेरी धाव घेण्याचा धोका पत्करतात. कारण मुख्य फलंदाज पुन्हा फलंदाजीला येऊ शकतो याची त्यांना कल्पना असते.

वाईड आणि नोबॉलकरता फलंदाजी करणाऱ्या संघाला दोन धावा मिळतात. पाच षटकं पूर्ण होण्याआधीच पाच विकेट्स पडल्या तर शेवटचा नाबाद फलंदाज रनरच्या साह्याने फलंदाजी करू शकतो. हा नाबाद फलंदाजच स्ट्राईकवर असतो. हा नाबाद राहिलेला फलंदाज बाद झाला की, डाव आटोपला असं समजण्यात येतं. सामना जिंकणाऱ्या संघाला प्रत्येकी २ गुण मिळतात.

यंदा या स्पर्धेत ७ आंतरराष्ट्रीय संघ आणि यजमान हाँगकाँग असे एकूण ८ संघ सहभागी होणार आहेत. ३ दिवस ही स्पर्धा चालेल. प्रत्येक सामना ४५ मिनिटांपेक्षा अधिक काळ चालत नाही. प्रत्येकी चार अशा दोन गटात ८ संघ विभागले गेले आहेत. पहिल्या दिवशीच्या निकालानुसार दुसऱ्या दिवशीच्या सामन्यांसाठी सीडिंग देण्यात येतं. दुसऱ्या दिवशी चार उपउपांत्यपूर्व सामने होतात. चार तळाचे संघ प्लेट गटात जातात. चार संघांमध्ये जेतेपदासाठी मुकाबला होतो.

भारतीय संघाने २००५ मध्ये या स्पर्धेचं जेतेपद पटकावलं होतं. रीतिंदर सिंग सोधी याला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं. २००६ मध्ये रॉबिन सिंग सर्वाधिक धावा केल्या होत्या.

## जिम्नॅस्ट दीपा कर्माकरची निवृत्ती

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय स्टार जिम्नॅस्ट दीपा कर्माकरने आपली कारकिर्द थांबवत असल्याचं जाहीर केलं आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून तिने ही घोषणा केली आहे. दीपा कर्माकर याच वर्षी आशियाई चॅम्पियनशिप जिंकणारी पहिली भारतीय जिम्नॅस्ट ठरली होती. तसेच रियो ऑलिम्पिक २०१६ स्पर्धेत तिचं कांस्य पदक अवघ्या काही गुणांनी हुकलं होतं. दीपा कर्माकरने आपल्या सोशल मीडियावरील पोस्टमध्ये जाहीर केलं आहे की, खूप विचारपूर्वक आणि चिंतन करून मी प्रोफेशनल जिम्नॅस्टिकमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे.

### संघर्षमय प्रवासाची अनोखी कहाणी

## जुनेद खान मुंबईचा वेगवान गोलंदाज

। मुंबई । वृत्तसंस्था ।

मुंबई संघाने यावेळी तब्बल २७ वर्षांनंतर इराणी चषकाचे विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात रेस्ट ऑफ इंडियाचा पराभव करून मुंबईने १५ व्यांदा इराणी चषकाचे जेतेपद पटकावले. इराणी चषक २०२४ मध्ये मुंबईच्या एका वेगवान गोलंदाजाचे पदार्पण पाहता भविष्यात तो संघात सामील होईल, अंदाज व्यक्त केला जात आहे. हा पदार्पण करणारा वेगवान गोलंदाज दुसरा कोणी नसून जुनेद खान आहे. कन्नौजचा रहिवासी असलेल्या जुनेद खान वयाच्या १३ व्या वर्षी घर चालवण्यासाठी चालवला रिक्षा चैलवक होता.

जुनैद मुंबईत आला तेव्हा तो केवळ १३ वर्षांचा होता. मुंबईत आल्यानंतर जुनेदला आधी कामाच्या शोधात असलेल्या रिक्षा चालवावी लागली. जुनेद अल्पवयीन असूनही त्याने आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी रिक्षा चालवली आहे. तो एकदा रिक्षा चालवत संजीवनी क्रिकेट अकादमीत पोहोचला. मुंबईचा माजी यष्टीरक्षक मनीष बंगेरा तेथे कामकाज पहायचे. अशा



परिस्थितीत जेव्हा तो संजीवनी क्रिकेट अकादमीमध्ये खेळण्यासाठी पोहोचला तेव्हा बंगेराने त्याला गोलंदाजी करताना पाहिले. जुनेदच्या गोलंदाजी कौशल्याने बंगेरा इतके प्रभावित झाले की त्याने जुनेदला सरावासाठी बोलावले.

यानंतर जुनेद रोज तिथे गोलंदाजीचा सराव करायला यायचा. लॉकडाऊन दरम्यान भारताचे सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायर यांनी जुनेदची प्रतिभा ओळखली. द हिंदूला दिलेल्या मुलाखतीत जुनेद म्हणाला, अभिषेक नायर यांनी मला खूप मदत केली. आज मी जो काही आहे तो त्यांच्यामुळेच. ते नसते, तर आज मी जिथे आहे, तिथे पोहोचू शकलो नसतो. त्यांनीच माझे रिक्षा चालवणे बंद केले आणि मला संपूर्ण लक्ष क्रिकेटवर केंद्रीत करायला सांगितले. यानंतर मी त्यांच्या अकादमीत प्रशिक्षण घेऊ लागलो. त्यांनी मागील आयपीएलच्या हंगामात केकेआरसाठी नेट गोलंदाज म्हणून घेतले होते. क्रिकेट प्रवास खूप संघर्षमय राहिला आहे. डोळ्यात क्रिकेटचे स्वप्न घेऊन जुनेद खान कन्नौजहून मुंबईत पोहोचला होता, पण त्याचे स्वप्न पूर्ण करण्यात अनेक अडथळे आले.

जुनेदच्या कारकिर्दीत टर्निंग पॉइंट आला. जेव्हा तो स्थानिक स्पर्धेत पीजे हिंदू जिमखान्याचे प्रतिनिधित्व करताना सर्वांना प्रभावित करण्यात यशस्वी ठरला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)